मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १९७ ■ शनिवार, २८ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## थोडक्यात

### खांदा कॉलनीत नव्याने बसविण्यात आली फुटपाथवरील झाकणे नगरसेविका सिताताई पाटील यांचा पाठपुरावा



**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी :** खांदा कॉलनीत अनेक ठिकाणी फुटपाथवरील झाकणे तुटलेली होती यासंबंधी सेक्टर 13 मधील नागरिकांच्या तक्रारीं आल्या होत्या या फुटपाथवरील तुटलेल्या झाकणामुळे फुटपाथवरून चालणाऱ्या नागरीकांचा अपघात होऊ शकतो हि गंभीर बाब लक्षात घेऊन आलेल्या तक्रारींची दखल घेऊन तात्काळ नगरसेविका सिताताई पाटील यांनी पनवेल महापालिकेला याबाबत पत्र देऊन झाकणे नव्याने लावण्यासाठी निवेदन दिले होते या पत्राची दखल घेऊन सेक्टर 13 मध्ये व इतर ठिकाणी महापालिकेने तात्काळ झाकणे बसवली नगरसेविका सिताताई पाटील व नागरिकांनी याबाबत पनवेल महापालिकेचे आभार व्यक्त केले



**पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांचे पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या कोर कमिटीच्या वतीनेपुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार विवेक पाटील, संजय कदम, मंदार दोंदे यांच्यासह मंचाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.**

**( दैनिक युवक आधार )**


# आकाशात झगमगला महाराष्ट्राचा इतिहास आणि संस्कृती


## २ हजार ड्रोनच्या साहाय्याने प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज व मुंबईची ओळखीचे स्थळे आकाशात साकारली

**मुंबई :** सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने श्रीराम नवमी तसेच संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त आझाद मैदान येथे भव्य ड्रोन शोचे आयोजन करण्यात आले.

रात्रीच्या गडद आकाशात झेपावलेल्या ड्रोननी प्रभू श्रीरामांची धनुर्धारी प्रतिमा साकारत कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ भव्य प्रतिमेने आकाश उजळून निघताच उपस्थितांकडून 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'चा जल्लोष झाला. पुढे छत्रपती संभाजी महाराज, महाराष्ट्रातील गड-किल्ले, गणराय तसेच संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिमा आकाशावर साकारत महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा अभिमानास्पद प्रवास सादर करण्यात आला.

या सोहळ्यात मुंबई शहराची ओळखही प्रभावीपणे उभी करण्यात आली. गेटवे ऑफ इंडिया, वांद्रे-वरळी सी-लिंक, ताज महल पॅलेस हॉटेल यांसारख्या स्थळांचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले. याशिवाय 'वंदे भारत' रेल्वे धावत असल्याचा






भास निर्माण करणारे दृश्य प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरले. सुमारे १० ते १५ मिनिटे चाललेल्या या शोदरम्यान आझाद मैदानावर उपस्थित आबालवृद्धांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत क्षणोक्षणी टाळ्यांचा कडकडाट केला.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री मा. ॲड. आशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा, ऐतिहासिक वारसा आणि राष्ट्राभिमान जगासमोर प्रभावीपणे मांडण्याचा हा प्रयत्न आहे. महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वातून प्रेरणा घेऊन सांस्कृतिक वारसा जपण्याचे काम सातत्याने सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याची संस्कृती 'सॉफ्ट पॉवर' म्हणून विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या उपक्रमाची संकल्पना प्रख्यात संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या कल्पनेतून साकारली असल्याचेही सांगितले गेले. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जयंती वर्षानिमित्त विशेष दृश्यरचना सादर करण्यात आली.

सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सांगितले की, रामनवमीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या परंपरेचे वैभव आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची गाथा आधुनिक माध्यमातून सादर करण्याचा हा अभिनव प्रयत्न आहे.आकाशाच्या विशाल पटावर शिवचरित्र उलगडण्याचा हा उपक्रम प्रेक्षकांसाठी एक वेगळाच अनुभव ठरला. एकूणच, ड्रोन शोच्या माध्यमातून परंपरा आणि तंत्रज्ञानाचा संगम घडवत मराठी अस्मितेची गाथा आकाशावर रेखाटणारा हा सोहळा मुंबईकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

## सणसर गावातील रमजान उपक्रम : मा.शंभूराज निंबाळकर यांची सामाजिक बांधिलकी

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : सणसर गावातील युवा नेते मा.शंभूराज जगदीश निंबाळकर यांनी सामाजिक बांधिलकी जपत सलग तिसऱ्या वर्षी रमजान महिन्याच्या निमित्ताने गावातील व परिसरातील जवळपास ६० कुटुंबांना शीरखुर्मा करण्यासाठी लागणारे साहित्य – ड्रायफ्रूट बॉक्स वाटप केले.हा उपक्रम त्यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ कै.जगदीश विनायकराव निंबाळकर यांच्या नावाने राबवला असल्याची माहिती देण्यात आली. सणसर गावात मागील वर्षी सलग दोन वेळा पूर आला होता.त्या संकटाच्या काळातही मा.शंभूराज निंबाळकर यांनी पूरग्रस्तांना चहा-नाश्ता व अन्नदान करून सामाजिक बांधिलकी जपली होती.त्यामुळे त्यांच्या कार्याची गावात विशेष दखल घेतली जात आहे पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम समाजाला एकात्मतेचा व सद्भावनेचा संदेश देणारा हा उपक्रम गावात चर्चेचा विषय ठरला आहे. शंभूराज निंबाळकर यांनी गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने हा उपक्रम राबवून सामाजिक सलोखा जपण्याचा प्रयत्न



केला आहे.या उपक्रमाबद्दल मुस्लिम समाजाच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.समाजातील ज्येष्ठांनी व युवकांनी त्यांच्या या कार्याचे कौतुक करत,"हा उपक्रम केवळ मदतीचा नाही तर सामाजिक ऐक्याचा आणि धार्मिक सौहार्दाचा प्रतीक आहे,"असे मत व्यक्त केले. गावातील नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत,रमजानच्या पवित्र महिन्यात मा.शंभूराज निंबाळकर यांनी दाखवलेली सामाजिक बांधिलकी ही प्रेरणादायी असल्याचे सांगितले जात असून त्यांचा मोठा मित्रपरिवार सुद्धा सामाजिक बांधलीकी जपण्यासाठी नेहमीच साथ देत असल्याची चर्चा केली जात आहे.

## कोमसापतर्फे प्रा.चंद्रकांत मढवी यांचा सन्मान; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वाटचालीत योगदान दिल्याबद्दल कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे संस्थापक अध्यक्ष,ज्येष्ठ साहित्यिक प्रा.चंद्रकांत मढवी यांचा कवी केशवसुत स्मारक मालगुंड(रत्नागिरी) येथे कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात अध्यक्षा



नमिता कीर, कार्याध्यक्ष डॉ.प्रदीप ढवळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. हा सन्मान झाल्याबद्दल पनवेल येथे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रा.चंद्रकांत मढवी यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कोकण मराठी साहित्य परिषदेचे केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी तसेच ॲड. मनोज म्हात्रे, कवी गणेश म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, श्याम पुंडे, संजय गोडसे, भालचंद्र जुमलेदार, समीर वेश्वीकर आदी उपस्थित होते.

## जिद्द आणि चिकाटीचे मूर्तिमंत उदाहरण: कु. वैष्णवी मारुती जाधव महाराष्ट्र पोलीस दलात निवड




**दैनिक युवक आधार**

**गेवराई तालुका प्रतिनिधी/भीमराव गावडे :** कष्ट, चिकाटी आणि जिद्द असेल तर अशक्य वाटणारी गोष्टही साध्य करता येते, हे गेवराई तालुक्यातील कुंभारवाडी या छोट्याशा गावातील तरुणीनी सिद्ध करून दाखवले आहे. तालुक्यातील 'कुंभारवाडी येथील दोन सख्ख्या बहिणींनी एकाच वेळी महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.यावेळी मादळमोहीतील संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल यांच्यावतीने सन्मान करण्यात आला

कु.वैष्णवी मारुती जाधव यांची बीड पोलीस दलात निवड झाली आहेत तर सखी बहिण कु.क्रांती मारुती जाधव वेटिंग लिस्ट मध्ये आहे अशी या यशस्वी झालेल्या दोन बहिणींची नावे आहेत.

**संघर्षातून यशाकडे वाटचाल**

एकाच कुटुंबातील दोन बहिणी एकाच वेळी शासकीय सेवेत, तेही पोलीस दलासारख्या शिस्तबद्ध विभागात भरती होणे ही अत्यंत दुर्मिळ आणि अभिमानास्पद घटना मानली जात आहे. अत्यंत सामान्य परिस्थितीतून पुढे येत या दोन्ही बहिणींनी पोलीस भरतीसाठी लागणारे कठोर परिश्रम आणि जिद्द कायम ठेवली होती. त्यांच्या या यशामुळे केवळ जाधव कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण कुंभारवाडी गावाचे नाव राज्यपातळीवर उज्ज्वल झाले आहे.तसे पाहिले तर कुंभारवाडी गावाची ओळख अधिकाऱ्यांचे गाव अशी वाटचाल चालू आहे.यापूर्वी पण अनेक तरुण शासकीय सेवेत दाखल झाले आहेत.

यांच्या यशाने ग्रामीण भागातील इतर तरुणांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे. सोशल मीडियावरही त्यांच्या यशाची मोठी चर्चा असून, "तुमच्या संघर्षाला आणि यशाला मानाचा मुजरा" अशा शब्दांत नेटकरी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री गावडे सर ,श्री मारुति जाधव ,वीर योद्धा अकॅडमीचे संचालक श्री अमित कनाडे व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते पुढील पोलीस सेवेसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## जनगणना २०२७ : नियमांचे काटेकोर पालन करा; अचूक माहितीच विकासाचा पाया" – जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

### तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराला वाशिममध्ये उत्साहात प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नसून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणे ठरविण्याचा मूलभूत पाया आहे. त्यामुळे प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याने निर्धारित मार्गदर्शक सूचनांचे व नियमावलीचे काटेकोर पालन करत अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह माहिती संकलित करावी, असे स्पष्ट प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जनगणना संचालनालय व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ दि. २६ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात उत्साहात झाला. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले.

यावेळी परिविक्षाधीन आयएएस अधिकारी तथा कारंजा उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर,



नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, जनगणना संचालनालयाचे सहायक संचालक प्रवीण भगत, जिल्हा समन्वयक ऋषीकेश पाथरे, शशांक रुखने आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुंभेजकर पुढे म्हणाले की, जनगणना प्रक्रियेत वेळेचे नियोजन आणि अचूकता अत्यंत महत्त्वाची आहे. मागील तीन महिन्यांपासून यासाठी व्यापक पूर्वतयारी सुरू असून संपूर्ण यंत्रणा सक्षमपणे कार्यरत आहे. प्रशिक्षणार्थ्यांनी या शिबिरात सक्रिय सहभाग घेत आपल्या सर्व शंकांचे निरसन करून घ्यावे. इन्स्ट्रक्शन मॅन्युअलचा सखोल अभ्यास केल्यास प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना कोणतीही अडचण येणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी सांगितले की, टॉप-टू-बॉटम सर्व स्तरांवरील यंत्रणेसाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर आयोजित या शिबिरामुळे प्रत्यक्ष कामकाजात येणाऱ्या अडचणींवर मात करता येईल. या प्रशिक्षणातून सक्षम, सजग आणि जबाबदार मनुष्यबळ तयार होऊन जनगणना प्रक्रिया अधिक प्रभावी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रशिक्षणादरम्यान जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने समजावून सांगण्यात आली. डिजिटल साधनांचा वापर, मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलन, डेटा एंट्रीतील अचूकता तसेच माहितीची गोपनीयता राखण्याचे नियम यावर विशेष

> **"जनगणना ही देशाच्या विकास आराखड्याची पायाभूत प्रक्रिया आहे. प्रत्येकाने जबाबदारीने काम करून विश्वासार्ह माहिती संकलित केली, तरच भविष्यातील धोरणे अधिक प्रभावी ठरतील."**
> **— योगेश कुंभेजकर, जिल्हाधिकारी**

भर देण्यात आला. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रशिक्षण अधिक प्रभावी केले. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष सरावाची संधी देत विविध परिस्थितींमध्ये कार्य करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले.

या तीन दिवसीय शिबिरामुळे सहभागींच्या ज्ञानात व कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होऊन आगामी जनगणना अधिक अचूक व परिणामकारकपणे पार पाडता येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.कार्यक्रमाचे संचालन प्रा. गजानन वाघ यांनी केले, तर आभार सहाय्यक महसूल अधिकारी अतुल देशमुख यांनी मानले.

या प्रशिक्षणासाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी, नायब तहसीलदार, जनगणना टेक्निकल असिस्टंट, गणनाकर्ते व पर्यवेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोनारी गावामध्ये रंगला टेनिस क्रिकेट चा थरार

## "रायगड प्रीमियर लीग पर्व ६ वे" चा मानकरी ठरला कॅप्टन किरण पवार चा वीर मराठा संघ

**दैनिक युवक आधार**

**राम ढाकणे उरण रायगड :** गेले सहा वर्ष सातत्याने, प्रत्येक वर्षी रायगड प्रीमियर लीग चा थरार टेनिस क्रिकेट विश्वामध्ये गाजत आहे.. या वर्षी मौजे सोनारी तालुका उरण येथील भव्य मैदानावर माजी सरपंच महेश नरेश कडू व मित्र परिवार सोनारी यांनी टेनिस क्रिकेट चा थरार, "रायगड प्रीमियर लीग पर्व ६ वे" चे आयोजन केले होते, यामध्ये विशेष खारीचा वाटा असणारे रायगड क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष मंगेश जी वाकडीकर, रायगड प्रीमियर लीग असोसिएशन चे अध्यक्ष राकेश गायकवाड, विजय खानवकर यांचे विशेष सहकार्य राहिले आहे.

रायगड टेनिस क्रिकेट च्या रायगड प्रीमियर लीग मध्ये, हर्षद पितळे यांच्या " वीर मराठा जोये पेन" या संघाने किरण पवार च्या नेतृत्वाखाली उत्कृष्ट खेळ करत प्रथम पारितोषिक ५ लाख रुपये चे रोख पारितोषिक, प्रथम क्रमांकाचा आकर्षक चषक पटकावला तसेच या लीगचे आयोजक माजी सरपंच सोनारी, महेश नरेश कडू यांच्यावतीने आकर्षक अशी चांदीची ट्रॉफी देण्यात आली आहे. तसेच अनुप पाटील पुरस्कृत, "ए. आर. इंटरप्रिजेस कै. हिराजी ठाकूर स्मृती जासई " या संघाने विश्वजित ठाकूर च्या नेतृत्वाखाली चांगला खेळ करत, २ लाख ५० हजार रुपयाचे रोख पारितोषिक व द्वितीय क्रमांकाचे चषक पटकावत उपविजेते पद मिळवले आहे. तिसरा




आणि चौथा क्रमांक अनुक्रमे हेमंत सणस यांचा संघ "अर्चित ऑर्रीयर्स तळा रोहा" आणि मयूर शेठ घरत यांचा "जय माता दि दिघोडे रिबल्स या दोन्ही संघाने प्रत्येकी १लाख २५ हजार रोख पारितोषिक व आकर्षक चषक पटकावले आहेत.

या रायगड प्रीमियर लीगच्या माध्यमातून उत्कृष्ट खेळ दाखवणाऱ्या खेळाडूंना खूप मोठे मोठे बक्षीसे देऊन सन्मानित केले जाते, यामध्ये प्रामुख्याने उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून "वीर मराठा जोये पेन" या संघाचा खेळाडू समीर आवस्कर याला मोटारसायकल व आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून याच संघाचा खेळाडू अभिजित मोरे याला देखील मोटारसायकल व आकर्षक चषक देऊन सन्मानित केले, तसेच उत्कृष्ट फलंदाज म्हणून "अर्चित ओरियर्स रोहा" या संघाचा खेळाडू निखिल पारवे याला देखील मोटारसायकल व आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले. खरं तर सर्व सीरिज मध्ये प्रत्येक सामन्यामध्ये सतत चांगली कामगिरी करत आपल्या संघाला विजयाच्या दिशेने घेऊन जाणे, चांगला खेळ दाखवणे असा एक खेळाडू जो "मॅन ऑफ द सिरीज" चा मानकरी ठरतो, तो म्हणजे १८९ पॉईंट मिळवलेला "जय माता दि दिघोडे रिबल्स" या संघाचा खेळाडू, फुंडे गावचा प्रथमेश म्हात्रे (बिट्टू) याला कामगार नेते महेंद्र शेठ घरत यांच्या वतीन एक चार चाकी (कार) व आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

खरं तर टेनिस क्रिकेट मध्ये खूपच छान पद्धतीचे आयोजन महेश कडू व मित्र मंडळ सोनारी यांनी केले होते, त्यामध्ये प्रामुख्याने सुनंदा मंडप च्या अप्रतिम डेकोरेशन ने सजवलेले सोनारी गावातील क्रिकेट चे मैदान जणू स्वर्ग च वाटत होते.. सगळे सामने डे नाईट खेळवले गेले आहेत आणि (24 live events) 24 लाइव्ह इव्हेंट्स या ३ लाख ५० हजार सबस्क्राईबर असणारे युट्यूब चॅनेल च्या माध्यमातून सर्व अख्खा महाराष्ट्र व भारत भर दाखवण्यात आले आहेत, चंद्रकांत शेठ, शेखर शेठ तांडेल यांची खंबीर साथ, आणि कुठलाही कार्य हातामध्ये घेतले की एक "दैवी शक्ति" सतत माझ्या पाठीमागे खंबीर पणे उभी असते ते म्हणजे उरण विधानसभेचे आमदार महेश शेठ बालदी यांच्या आशिर्वादाने व सोनारी गावाच्या प्रत्येक नागरिकाच्या सहकार्याने एव्हडी मोठी "रायगड प्रीमियर लीग" यशस्वी रित्या पार पाडु शकलो अशा पद्धतीने महेश कडू यांनी श्री सिद्धिविनायक सोनारी गणपती बाप्पा ला साकडे घालून सर्व गावाचे, प्रेक्षक दर्शकांचे, प्रत्येक खेळाडूंचे, प्रत्येक मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

# म्हसळा तालुक्यातील मेंढरी ग्रामीण भागात दंत तपासणी शिबिराचा आयोजन

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** म्हसळा तालुक्यातील मेंढडी ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उदात्त हेतूने स्वराध्या फाउंडेशन यांच्या पुढाकारातून तेरणा दंत रुग्णालय, अष्टविनायक हॉस्पिटल टीम व लाईन्स हेअल्थ फाऊडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मेंढडी येथील शाळेत भव्य मोफत आरोग्य व दंत तपासणी शिबिर उत्साहात



पार पडले. या उपक्रमास विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मुख्याध्यापक किशोर मोहिते, अध्यक्ष सचिन भुनेसर, सचिव शुभांगी भुनेसर, कोळी समाज अध्यक्ष मोरेश्वर पाटील व डॉ. अनिकेत मेस्त्री व डॉ.बालाजी जनराव व डॉ.निलेश म्हात्रे नेत्रचिकीसक लाईन्स हेअल्थ फौंडेशन व अधिक सहकार्य प्राथमिक आरोग्य केंद्र म्हसळा यांच्या उपस्थितीत शिबिर अधिक प्रभावी ठरले. शिबिरामध्ये दंत व सामान्य आरोग्य तपासणी, औषध वितरण व मार्गदर्शन करण्यात आले, तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत खाऊ वाटप करण्यात आला याशिवाय वैद्यकीय उपचाराची गरज असलेल्या रुग्णांना मोफत मदत उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमामुळे केवळ उपचारच नव्हे तर आरोग्याबाबत जागरूकता आणि समाजसेवेची प्रेरणा निर्माण झाली असून “एक हात मदतीचा” हा संदेश खऱ्या अर्थाने साकार झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# होय,आपण क्षयरोग संपवू शकतो-पनवेल मनपाचा निर्धार !

### टी .बी .मुक्त भारत अभियान अंतर्गत 100 दिवसीय मोहिमेची दमदार सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत ‘टी.बी. मुक्त भारत अभियान’ अंतर्गत 100 दिवसीय क्षयरोग मोहिमेचा उद्धाटन समारंभ 24 मार्च 2026 रोजी जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे संपन्न झाला.केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रीय स्तरावर मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाचे ऑनलाईन पद्धतीने थेट प्रक्षेपण कार्यक्रम फडके नाट्यगृहात



येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे तसेच नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते.

# प्रा. डॉ. महेश बनकर यांना ‘नालंदा कर्तृत्व गौरव’ राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** नालंदा विद्यापीठ व फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय “आदर्श शिक्षक व सुप्रसिद्ध निवेदक” या प्रतिष्ठेच्या “नालंदा कर्तृत्व गौरव” पुरस्काराने निफाड येथील प्रा. डॉ. महेश बनकर यांना नुकतेच सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा पुण्यातील पत्रकार भवन, नवी पेठ येथे मोठ्या उत्साहात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेअंतर्गत कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निफाड येथे कार्यरत असलेले प्रा. डॉ. महेश बनकर हे उपक्रमशील, विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय आणि विविधांगी कार्य करणारे प्राध्यापक म्हणून ओळखले जातात. त्यांनी शिक्षण क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली आहे. त्याचबरोबर सामाजिक, सांस्कृतिक तसेच निसर्ग संवर्धनाच्या क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. उत्कृष्ट निवेदन कौशल्यामुळे ते सुप्रसिद्ध निवेदक म्हणूनही परिचित आहेत.या सर्व कार्याची दखल घेत नालंदा विद्यापीठ व फाउंडेशनकडून त्यांना सपत्नीक सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळयास डॉ. राजेंद्र सिंह वालिया (महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष व माजी सैनिक), श्री. नितीन धवणे पाटील (राष्ट्रीय अध्यक्ष, मराठी चित्रपट असोसिएशन), डॉ. नीता जोशी (शास्त्रज्ञ), श्री. दीपक जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या पुरस्काराबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई भागवत बोरस्ते, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, डॉ. भास्कर ढोके, प्रा. शशिकांत मोगल, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, डॉ. उत्तमराव डेर्ले यांच्यासह सर्व प्राध्यापकवर्ग, कर्मचारी, मित्रपरिवार व नातेवाईक यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.प्रा. डॉ. महेश बनकर यांच्या या यशामुळे निफाड परिसरासह संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

# राजेश ढोले यांना ज्ञानदीप गौरव पुरस्काराने नाशिक येथे सन्मानित!

### पुसदच्या सुपुत्राचा नाशिक ऐतिहासिक नगरीत सत्कार व गुणगौरव

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी / राजू गायकवाड :** ज्ञानदीप सामाजिक विकास संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप गौरव पुरस्कार 24 मार्च 2026 पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते तथा विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे म्हणून परिचित असलेले राजेश ढोले यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

रोटरी हॉल, गंजमाळ नाशिक येथे ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले व सचिव मिलिंद कळवणकर, विलास पांगारकर, आयटकचे राजू देसले, आपलं महानगरचे वरिष्ठ उपसंपादक चंद्रमणी पटाईत, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश शिंदे, पत्रकार पुढारी उपसंपादक जिजा दवंडे, शिवव्याख्याते सचिन देवरे, सुनंदा पाटील, नीलिमा साठे, रवींद्र गायकवाड, मदन बढे या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला राजेश




ढोले हे पत्रकारिता व सामाजिक कार्यकर्ते असून पत्रकारितेच्या माध्यमातून दिन दलित वंचित श्रमिक मजूर सामान्य माणसाचे प्रश्न मांडून न्याय देण्याचा प्रयत्न करणारे तसेच सामाजिक व सांस्कृतिक व विविध क्षेत्रात त्यांची उल्लेखनीय कामगिरी असल्याने त्यांच्या कार्याची दखल म्हणून नाशिक येथील रोटरी क्लब सभागृह गंजमाळ येथे छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप पुरस्काराने त्यांचा गुणगौरव सन्मानपत्र ट्रॉफी व व अभिनंदन पत्र देऊन त्यांचा येथे सत्कार करण्यात आला आहे.

अध्यक्ष डॉ. अनिल आठवले, सचिव मिलिंद कळवणकर, उपाध्यक्ष एम. डी. प्रताप, खजिनदार अनिल कळंके, गोपाल कदम, अशोक शिरसाठ, राजेंद्र देवळे, ॲड. वैशाली आढाव, प्रमिला मुदलीयर, आनंद दाभाडे, सुनील आठवले, पंकज पवार, सुशील गांगुर्डे, पराग आमले, गणेश वाडेकर, गणेश निकाळजे, मनोज मुंडे, सनी सूर्यवंशी, विवेक बनकर आदींनी परिश्रम घेतले. त्यांच्या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

# दीपक कातकरी चिरनेर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी महाविकास आघाडीचे शेकापचे दीपक किसन कातकरी यांची बुधवारी निवड करण्यात आली आहे. चिरनेर ग्रामपंचायतीचे उपसरपंच अरुण हिराजी पाटील यांचा उपसरपंचपदाचा एक वर्षाचा कार्यकाळ संपल्यामुळे हे पद रिक्त झाले होते. दरम्यान बुधवारी (दि.25) अध्यासी अधिकारी तथा सरपंच भास्कर मोकल यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंचपदाची निवडणूक पार पडली असून, यामध्ये दीपक किसन कातकरी यांची चिरनेर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी निवड झाली आहे. याप्रसंगी सरपंच भास्कर मोकल, ग्रामविकास अधिकारी रवींद्र गावंड, शेकापचे चिटणीस सुरेश पाटील, शिवसेना उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, पोलीसपाटील



संजय पाटील, लाल ब्रिगेडचे नितीन म्हात्रे, माजी उपसरपंच सचिन घबाडी,माजी उपसरपंच समाधान ठाकूर, माजी सरपंच पद्माकर फोफेरकर, माजी उपसरपंच अरुण पाटील, ग्रामपंचायतीचे सदस्य प्रफुल्ल खारपाटील, समीर डुंगीकर, समुद्रा म्हात्रे, भारती ठाकूर, निकिता नारंगीकर वनिता गोंधळी, जयश्री चिर्लेकर, नीलम चौलकर, मृणाली ठाकूर, यशोदा कातकरी तसेच अन्य ग्रामस्थ उपस्थित राहून नवनिर्वाचित उपसरपंच दीपक कातकरी यांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर रायगड कबड्डी संघाच्या सराव शिबिराला उत्साहात प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या तयारीसाठी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पुरुष व महिला कबड्डी संघाच्या सराव शिबिराला पनवेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली आहे. दि. २६ मार्चपासून सुरू झालेले हे शिबीर दि. ३१ मार्च पर्यंत खांदा कॉलनी येथील सिकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर होत आहे.

दिनांक २ एप्रिल ते ६ एप्रिल २०२६ दरम्यान सिन्नर (जि. नाशिक) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा संघाची सक्षम तयारी व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून छत्रपती पुरस्कार विजेते



सूर्यकांत ठाकूर, संघ व्यवस्थापक प्रमोद म्हात्रे, सचिन पाटील, मंदार मुंबईकर, जितू मेमी, पदाधिकारी, प्रशिक्षक व कबड्डीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सराव शिबिरामध्ये पुरुष संघातील १४ खेळाडू व २ प्रशिक्षक तसेच महिला संघातील १४ खेळाडू व २ प्रशिक्षक अशा एकूण ३२ जणांचा सहभाग असून सर्व खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण दिले जात आहे. खेळाडूंना तांत्रिक, शारीरिक व मानसिक पातळीवर सक्षम बनविण्यावर विशेष भर दिला जात आहे. शिबिरातील खेळाडूंसाठी निवास, भोजन व इतर आवश्यक सुविधांची उत्तम व नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली असून प्रत्येक खेळाडूस संपूर्ण स्पोर्ट्स किट्स श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने प्रदान करण्यात आले. या शिबिरातून तयार होणारा रायगड जिल्हा कबड्डी संघ राज्यस्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. सदर सराव शिबीर दररोज सकाळी ६ ते सकाळी ९ वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत,क्रीडांगणावर होत असून दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी पुरुष व महिला कबड्डी संघ महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड स्पर्धेसाठी सिन्नर, नाशिक येथे रवाना होणार आहेत.

## सागर निकाळे यांचा राज्यस्तरीय गौरव




**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी /राहुल कुलकर्णी** : माणुसकी सामाजिक फाउंडेशनचे संस्थापक तसेच मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सागर निकाळे यांचा श्री छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय ज्ञानदीप गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. ज्ञानदीप सामाजिक विकास संस्था, नाशिक (महाराष्ट्र) यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सागर निकाळे यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या भरीव योगदानाची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली माणुसकी सामाजिक फाउंडेशनच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. समाजातील गरजू घटकांसाठी कार्य करण्याची त्यांची बांधिलकी विशेष उल्लेखनीय ठरली आहे.

हा गौरव सोहळा नाशिक येथील गंजमाळ परिसरातील रोटरी क्लब हॉलमध्ये उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून आदरांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले आणि सचिव मिलिंद कळवणकर यांनी केले होते. यावेळी महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या मान्यवर पुरस्कारार्थ्यांचा देखील सन्मान करण्यात आला.

सागर निकाळे यांच्या या सन्मानामुळे त्यांच्या सामाजिक कार्याला अधिक प्रेरणा मिळणार असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# टोल नाक्यावर सहायक पोलीस निरीक्षकाची संपादकासोबत दादागिरी

## टोल नाका बंद करून पोलीस अधिकाऱ्यास बडतर्फ करा !; महागाव पत्रकार महासंघाचे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव (यवतमाळ)** : दारव्हा तालुक्यातील कारंजा येथील टोल नाक्यावरील आंदोलनादरम्यान संपादकाशी हमरीतुमरी व धक्का बुक्की केल्याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज दाभाडे यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी महागाव तालुका पत्रकार महासंघाच्या वतीने करण्यात आली. तहसीलदार अभय मस्के यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे याबाबत निवेदन सादर करण्यात आले. २३ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ सी वरील भुलाई टोल प्लाझा




बंद करण्यासाठी महाविकास आघाडीचे आंदोलन सुरू होते. या आंदोलनाचे वृत्त संकलन करण्यासाठी विविध प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी घटनास्थळी उपस्थित होते. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी दारव्हा येथे बॅरिकेड्स लावून रस्ता काही काळासाठी बंद केला होता. ओळख पटवल्यानंतर माध्यम प्रतिनिधींना टोलनाक्याकडे जाण्याची परवानगीही देण्यात आली होती. मात्र, याच दरम्यान कर्तव्यावर तैनात असलेले एपीआय पंकज दाभाडे यांनी अचानक अक्रस्ताळी भूमिका घेत काही नागरिक व पत्रकारांना हाकलण्यास सुरुवात केली. दैनिक लोकसूत्रचे कार्यकारी संपादक केशव सवळकर हे वृत्तसंकलनासाठी तेथे उपस्थित असताना त्यांच्यासोबत धक्काबुक्की करत अपमानास्पद वर्तन करण्यात आले. सवळकर यांनी स्वतःचे ओळखपत्र दाखवूनही दाभाडे यांनी त्यांच्याशी उद्धट भाषेत बोलत हमरीतुमरी केली. घटनास्थळी इतर पोलीस अधिकारी उपस्थित असूनही केवळ दाभाडे यांनीच आक्रमक पवित्रा घेतल्याने पत्रकारांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या प्रकारामुळे पत्रकारितेच्या प्रतिष्ठेला धक्का बसल्याची भावना व्यक्त होत आहे. पुढे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपानंतर हा वाद सामोपचाराने मिटवण्याचा प्रयत्न झाला, मात्र संबंधित अधिकाऱ्यांच्या गैरवर्तनाबाबत नाराजी कायम असल्याचे पत्रकार महासंघाने स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर एपीआय पंकज दाभाडे यांच्यावर सेवाशिस्तभंग व गैरवर्तनाच्या आरोपांखाली कठोर कारवाई करून सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, अशी मागणी महागाव तालुका पत्रकार महासंघाने केली. पत्रकार महासंघाने आज एक निवेदन तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवले. निवेदन देताना पत्रकार महासंघाचे अध्यक्ष गणेश भोयर, मार्गदर्शक संजय भगत, गजानन वाघमारे, विनोद कोपरकर,अमोल राजवाडे, नंदकुमार कावळे, निलेश पाटील नरवाडे, डॉ. गजानन वैद्य, धम्मानंद कावळे, रियाज पारेख, राज पाटील नरवाडे, मनोज सुरोशे, बाळुभाऊ राठोड, अजय पाचंगे उपस्थित होते.

# लाखनीत प्रशासनाचा बुलडोझर मोर्चा; सर्विस रोडवरील अतिक्रमणावर मोठी कारवाई

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे /लाखनी तालुका प्रतिनिधी** : लाखनी शहरात दीर्घकाळापासून चर्चेत असलेल्या सर्विस रोडवरील अतिक्रमणावर अखेर जिल्हा व तालुका प्रशासनाने कडक कारवाई सुरू केली आहे. आज सकाळपासून पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात येत असून, संपूर्ण परिसरात तणावपूर्ण पण नियंत्रणात वातावरण पाहायला मिळत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अनधिकृतपणे उभारलेले स्टॉल, दुकाने व शेड्स यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता. नागरिकांकडून वारंवार



तक्रारी येत असूनही कारवाई लांबणीवर पडली होती. मात्र, अखेर प्रशासनाने ठोस पाऊल उचलत बुलडोझरच्या सहाय्याने Capsicum उखडून टाकण्यास सुरुवात केली आहे.या मोहिमेसाठी महसूल विभाग, नगरपंचायत , पोलीस प्रशासन यांची संयुक्त टीम कार्यरत असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. काही ठिकाणी अतिक्रमणधारकांनी नाराजी व्यक्त केली असली तरी प्रशासनाने नियमानुसार कारवाई सुरूच ठेवली आहे.प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि सार्वजनिक जागा मोकळ्या करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे. पुढील काळातही अशा अतिक्रमणांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.दरम्यान, या कारवाईमुळे सर्विस रोड मोकळा होऊन नागरिकांना दिलासा मिळणार असल्याची प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

# इंडसइंडकडून ‘कॅपिटल गेन्स अकाउंट स्कीम’

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** इंडसइंड बँकेने आज ‘कॅपिटल गेन्स अकाउंट स्कीम’ (सीजीएएस) सुरू केल्याची घोषणा केली. या योजनेअंतर्गत ग्राहकांना दीर्घकालीन भांडवली नफा पुन्हा गुंतवणूक करेपर्यंत या खात्यात सुरक्षित ठेवता येतो. तसेच, १९६१च्या आयकर कायद्यानुसार लागू असलेल्या तरतुदींप्रमाणे करसवलतींचा लाभही घेता येतो. या योजनेत न वापरलेला भांडवली नफा सुरक्षित आणि नियमांनुसार ठेवण्यासाठीची सुविधा मिळते. त्यामुळे ग्राहकांना कायद्याने ठरवलेल्या वेळेत योग्य निर्णय घेऊन पुन्हा गुंतवणूक करता येणार आहे.

ही योजना सुरू करण्यापूर्वी ‘सेंट्रल

IndusInd

बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस’ने (सीबीडीटी) इंडसइंड बँकेला ‘कॅपिटल गेन्स अकाउंट स्कीम, १९८८’ अंतर्गत ठेवी स्वीकारण्याची परवानगी दिली आहे.या योजनेअंतर्गत पात्र भांडवली मालमत्ता विक्रीतून मिळालेली आणि अजून वापरली न गेलेली रक्कम बँक स्वीकारते. यामध्ये निवासी घरे, फ्लॅट्स, फार्महाऊस, शेती जमीन, शहरी जमीन तसेच विशेष आर्थिक क्षेत्रातील जमीन यांचा समावेश होतो.इंडसइंड बँक सीजीएएसअंतर्गत दोन प्रकारची खाती देते. यातील पहिल्या प्रकारात बचत खाते समाविष्ट आहे. यामध्ये पैसे ठेवणे आणि काढणे सोप्या आणि लवचिक पद्धतीने करता येते. यात किमान शिल्लक ठेवण्याची अट नसते आणि साध्या बचत खात्यासारखे व्याज मिळते. दुसर प्रकार आहे मुदत ठेवी खात्याचा. यामध्ये ठराविक कालावधीसाठी पैसे ठेवता येतात. यात किमान १० हजार रुपयांपासून गुंतवणूक करता येते आणि तुलनेने जास्त परतावा मिळतो. हे खाते फेर गुंतवणुकीच्या कालावधीशी जुळवून घेता येते.

ही योजना इंडसइंड बँकेच्या अधिकृत आणि बिगर-ग्रामीण शाखांमध्ये उपलब्ध आहे. निवासी व्यक्ती, हिंदू अविभाजित कुटुंबे (एचयूएफ), इतर संस्था आणि अनिवासी भारतीय (एनआरआय) हे ग्राहक या योजनेसाठी पात्र आहेत.

# श्रीराम नवमी शोभायात्रा व ‘महारुद्र शिवराय’ महानाट्य उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सेलू /प्रतिनिधी शिवाजी पवार** : श्रीराम नवमीच्या निमित्ताने शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्या वतीने सेलू शहरात भव्य शोभायात्रा व ‘महारुद्र शिवराय’ महानाट्याचा प्रभावी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. शहरात सर्वत्र भक्तीमय आणि ऐतिहासिक वातावरण निर्माण झाले होते.सायंकाळी निघालेल्या शोभायात्रेत पारंपरिक वेशभूषेतील महिला व मुलींच्या लेझीम पथकाने तालबद्ध सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. त्याचबरोबर लाठी-काठीसारख्या साहसी क्रीडा प्रकारांचे थरारक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

या भव्य शोभायात्रेचा समारोप टिळक पुतळा परिसरात झाला. त्यानंतर ‘महारुद्र शिवराय’ महानाट्याचा बहारदार नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. या नाट्यप्रयोगात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम,धैर्य,आणि साहसाचे प्रभावी चित्रण करण्यात आले.

विशेष म्हणजे या महानाट्यात स्थानिक कलाकारांनी अत्यंत प्रभावी अभिनय साकारत प्रेक्षकांना अक्षरशः इतिहासाच्या काळात नेले. नाट्यप्रयोगातील संवाद, नेपथ्य, वेशभूषा आणि




पार्श्वसंगीत यांचा सुंदर मेळ साधण्यात आला होता. त्याकाळातील प्रसंगातील महत्त्वाचे टप्पे रंगमंचावर जिवंत करण्यात आले. कलाकारांच्या दमदार अभिनयाला प्रेक्षकांनी वेळोवेळी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

या महानाट्याचा मुख्य उद्देश नव्या पिढीसमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, त्याग आणि आदर्श यांची ओळख करून देणे हा होता. कार्यक्रमाद्वारे इतिहासाबद्दल अभिमान निर्माण होण्यास मदत झाली.कार्यक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला असून, सेलू शहरात भक्ती, परंपरा आणि ऐतिहासिक जाणीवेचा संगम पाहायला मिळाला. आयोजकांनीही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केलेल्या परिश्रमांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त प्रबोधनाचा भव्य जागर भंते कश्यप यांचे प्रभावी मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** मुंबईतील संघर्ष नगर, चांदिवली येथील ऋषी क्वारी परिसरात सम्राट मित्र मंडळ व सुजाता महिला मंडळ (रजि) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या २३३० व्या जयंतीनिमित्त समाजप्रबोधनाचा भव्य कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला. रात्री १० वाजेपर्यंत चाललेल्या या कार्यक्रमास आंबेडकरी अनुयायींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमात भंते कश्यप यांनी सम्राट अशोक यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रभावी प्रवचन दिले. त्यांनी मानवी जीवनातील कुशलकर्म,



नैतिक मूल्ये आणि योग्य आचार-विचार यावर सखोल मार्गदर्शन करत "माणसाने काय करावे आणि काय टाळावे” याचे स्पष्ट विवेचन केले. विशेषतः मुलांवर चांगले संस्कार घडविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र भालेराव यांनी प्रभावीपणे पार पाडले. आंबेडकरी चळवळीतील विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत सामाजिक एकजूट आणि जागरूकतेचा संदेश दिला. कार्यक्रमाचे आयोजक संदीप ढगे यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच क्रांती मोर्चाचे पदाधिकारी संतोष शिंदे हे विद्याविहार येथून विशेष उपस्थित राहिले. आपल्या भाषणात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी समाजाने एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन केले. “आपले हक्क आणि अधिकार कोण हिरावून घेत आहे, याचा सजगपणे विचार करण्याची गरज आहे,” असे ते म्हणाले. धम्मबंधू व माजी नगरसेवक ईश्वर तायडे यांनीही समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सत्तेत सहभाग आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.या कार्यक्रमात महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवण्यात आला. सुजाता महिला मंडळाच्या महिला कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले. एकूणच, सम्राट अशोक यांच्या क्रांतिकारी विचारांचा प्रसार आणि सामाजिक जागृती घडवून आणणारा हा कार्यक्रम उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला.

# आष्टी तालुक्यातील कापसी फाट्यावर कार-टिप्परची धडक; माय-लेकराचा होरपळून दुर्दैवी मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे** : आष्टी तालुक्यातील कापसी फाट्यावर आज एक अत्यंत भीषण आणि काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली आहे. टिप्पर आणि कार यांच्यात झालेल्या समोरासमोर धडक इतकी भीषण होती की, कारमधील माय-लेकराचा जागीच होरपळून मृत्यू झाला. आष्टी पंचायत समितीचे ग्रामसेवक तथा प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज यांच्या पत्नी आणि मुलावर हा काळाने





घाला घातला आहे.नेमकी घटना काय? मिळालेल्या माहितीनुसार, ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज यांची पत्नी पुष्पा श्रीहरी पुरी वय 42 आणि मुलगा ऋषिकेश श्रीहरी पुरी वय 25 हे कारने आष्टीकडून बीडकडे जात होते. कापसी फाट्याजवळ समोरून येणाऱ्या एका भरधाव टिप्परने कारला जोराची धडक दिली. या भीषण धडकेनंतर कारने पेट घेतला, ज्यामध्ये माय-लेकराला बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही आणि त्यांचा जागीच दुर्दैवी अंत झाला.

दीड तासांच्या प्रयत्नांनंतर मृतदेह बाहेर

अपघाताची भीषणता एवढी होती की, कारचा चेंदामेंदा झाला होता. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ, पोलीस आणि अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह कारमध्ये अडकलेले असल्याने ते बाहेर काढण्यासाठी प्रशासनाला तब्बल दीड ते दोन तास शर्थीचे प्रयत्न करावे लागले.

वडील कीर्तनात असतानाच काळाचा घाला

श्रीहरी पुरी हे आष्टी पंचायत समितीत ग्रामसेवक म्हणून कार्यरत असून ते एक उत्तम कीर्तनकार देखील आहेत. ज्यावेळी ही हृदयद्रावक घटना घडली, त्यावेळी पुरी महाराज एका कीर्तनाच्या कार्यक्रमात व्यस्त होते, अशी माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्यात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे

# ईद निमित्त मुस्लिम बांधवांकडून तिवरंग ग्रामस्थांना मिष्ठानाच्या जेवणाची मेजवानी

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव ( यवतमाळ)** : ईदच्या पावन पर्वानिमित्त मुस्लिम बांधवांकडून तिवरंग येथील ग्रामस्थांसाठी मिष्ठान्न भोजनाची खास मेजवानी आयोजित करण्यात आली. या उपक्रमातून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकात्मतेचा सुंदर संदेश देण्यात आला.या मेजवानीत सर्व धर्मीय नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. विविध गोड पदार्थांसह स्वादिष्ट जेवणाचा आनंद घेताना ग्रामस्थांनी परस्परांतील प्रेम आणि जिव्हाळा अधिक



दृढ केला. कार्यक्रमाचे वातावरण आनंदी व उत्साहपूर्ण होते.या उपक्रमामुळे गावात एकोपा आणि सौहार्द वाढीस लागून "एक गाव, एक कुटुंब" ही भावना अधिक बळकट झाल्याचे नागरिकांनी व्यक्त केले.

# भारतीय बौद्ध महासभेची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/प्रकाश गवारे** : दि. २५ मार्च २०२६ रोजी श्रद्धास्थळ भीमघाट येथे भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने एक महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत संघटनेच्या सुरू असलेल्या कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला तसेच आगामी काळातील दिशा व धोरणांवर व्यापक चर्चा करण्यात आली.



बैठकीत संघटनेत सक्रियपणे कार्यरत असलेले बौद्धाचार्य एस. एन. हनुमंते (विष्णुपुरीकर) यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेण्यात आली. त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांची नांदेड उत्तर जिल्हा शाखेच्या संरक्षण सचिवपदी निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन व्यक्त करून पुढील धम्म कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या बैठकीस जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड, सरचिटणीस दामोदर सरकटे, कोषाध्यक्ष सुभाष नरवाडे, कार्यालयीन सचिव सा. ना. भालेराव तसेच सुरेश गजभारे, रवीकिरण जोंधळे, कुमारस्वामी माने, कृष्णाजी गजभारे, आप्पाराव येरेकर, आनंदराव झडते, जनार्दन जमदाडे, डी. एन. कांबळे, शंकर गायकवाड आणि सुभाष लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी संघटनेचे बळकटीकरण करण्याबरोबरच धम्म प्रसार अधिक प्रभावी करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला.

# व्यसनाच्या आगीत होरपळलेल्या संसारांना सावरणारा 'देवदूत'; जितेंद्र मुंडकर यांना राज्यस्तरीय 'महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' प्रदान!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** ज्या दारूच्या व्यसनाने स्वतःचं बालपण करपलं, ज्या व्यसनामुळे वडिलांचे संसाराकडे दुर्लक्ष झाले आणि घराची दयनीय अवस्था झाली, त्याच वेदनेला 'जिद्दीचे 'हत्यार बनवून पनवेलच्या एका ध्येयवेढ्या तरुणाने उभ्या महाराष्ट्रात व्यसनमुक्तीची मशाल पेटवली आहे. चिंचपाडा (ता. पनवेल) येथील कराडी समाजाचे सुपुत्र श्री जितेंद्र दत्तात्रेय मुंडकर यांच्या या निस्वार्थ आणि सातत्यपूर्ण संघर्षाची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना वर्ष २०२५-२६ चा मानाचा 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' देऊन गौरविले आहे.



मुंबई येथे २६ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या एका भव्य सोहळ्यात, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने मान.आमदार संजय शिरसाठ यांच्या हस्ते मुंडकर यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्मृतीचिन्ह, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून, मुंडकर यांच्या 'व्यसनमुक्त महाराष्ट्र' अभियानावर आता शासनाने अधिकृत मोहर उमटवली आहे.

जितेंद्र मुंडकर यांनी स्वतःच्या आयुष्यात व्यसनाचे चटके सहन केले होते. "जी वेळ माझ्या कुटुंबावर आली, ती दुसऱ्या कोणावरही येऊ नये," या एकाच भावनेतून त्यांनी २०१७ मध्ये 'व्यसन' नावाचा दीड तासाचा चित्रपट निर्माण केला. स्वतः मुख्य भूमिका साकारत, गावोगावी स्वतःची गाडी घेऊन मुंडकर हा चित्रपट विनामूल्य दाखवत फिरत आहेत. आजवर या चित्रपटामुळे हजारो तरुणांनी सिगारेट, दारू आणि अमली पदार्थांना कायमचा रामराम थोकला असून अनेक उद्ध्वस्त होणारे संसार पुन्हा सावरले आहेत.

मुंडकर यांच्या कार्याची व्याप्ती फार मोठी आहे त्यांच्या या निस्वार्थ सेवा यज्ञामुळे, मिळालेल्या या राज्यस्तरीय यशामुळे चिंचपाडा ग्रामस्थ आणि त्यांच्या मित्र परिवाराकडून मोठे प्रोत्साहन मिळत असून त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षं होत आहे. चिंचपाडा गावच्या सुपुत्राने राज्यपातळीवर नाव उज्वल केल्याने चिंचपाड्यात आनंदाचे वातावरण आहे चिंचपाडा गाव तसेच संपूर्ण रायगडवासियांच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. राज्यस्तरीय सर्वोच्च पुरस्कार मिळालेल्याने मुंडकर त्यांच्या या मोहिमेला नवे एक बळ मिळाले आहे.

"माझा चित्रपट पाहून गावातील एकाने जरी व्यसन सोडले तरी या चित्रपट निर्मितीचे सार्थक झाले" असे भाऊक उद्गार जितेंद्र मुंडकर यांनी पुरस्कार स्वीकारताना काढले. तरुण पिढीला पुस्तकांकडे आणि सुसंस्कृत जीवनाकडे वळवण्यासाठी हे त्यांचे कार्य समाजासाठी एक सकारात्मक परिवर्तनाचा दीपस्तंभ ठरत आहे.

संपूर्ण महाराष्ट्रातून मुंडकर यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून त्यांच्या या व्यसनमुक्त प्रवासाला आता अधिक गती मिळणार आहे.

# युवा भारुड रत्न शेखर भाकरे यांना राज्यस्तरीय 'महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' प्रदान

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड:-** लोककलेच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचा वारसा जपणारे रहिमाबाद (ता. सिल्लोड) येथील सुपुत्र आणि युवा भारुड रत्न शेखर निरंजन भाकरे यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठित 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने आयोजित या सोहळ्यात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ आणि राष्ट्रीय समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांच्या हस्ते शेखर भाकरे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, माजी गृहराज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे, आमदार डॉ. तुषार राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

**प्रबोधनाचा वारसा सातासमुद्रापार:**

शेखर भाकरे हे त्यांचे वडील भारुड महर्षी स्व. निरंजनजी भाकरे यांचा प्रबोधनाचा वारसा समर्थपणे पुढे नेत आहेत. 'भारुड रंग' या उपक्रमाद्वारे त्यांनी गावोगावी व्यसनमुक्ती, हुंडाबंदी, स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध, पर्यावरण संवर्धन आणि सेंद्रिय शेती या विषयांवर प्रबोधन केले आहे. प्रयागराज येथील महाकुंभमेळा, वेरूळ-अजिंठा महोत्सव आणि झी टॉकीजच्या 'मन मंदिरा' कार्यक्रमातूनही त्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश प्रभावीपणे मांडला आहे.

"हा पुरस्कार म्हणजे माझ्या वडिलांच्या मार्गदर्शनाचा आणि आजवर केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव आहे.

भविष्यात अधिक जोमाने व्यसनमुक्तीचे कार्य सुरू ठेवणार," अशी भावना पुरस्कार स्वीकारल्यानंतर शेखर भाकरे यांनी व्यक्त केली.

# उदयास येणारा सणसरच्या पै.मनिष रायते याने दिली पै.सिकंदर शेख याला कडवी झुंज

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : सणसर रायतेमळा येथील व श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालय भवानीनगरचा युवा पैलवान मनिष मनोहर रायते (वय २२) याने नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत दमदार झुंज देत आपले नाव गाजवले आहे.देशभरात आपली छाप असलेल्या बलाढ्य पैलवान सिकंदर शेख याच्याविरुद्ध मनिषने दिलेली झुंज ही चुरशीची ठरली.पराभव पत्करावा लागला असला तरी शेखलाही ही कुस्ती सोपी गेली नाही असे जाणकारांनी नमूद केले.लहानपणापासून कुस्तीची आवड असलेल्या मनिषने भवानीनगर येथील श्री छत्रपती व्यायामशाळेत वस्ताद लालासाहेब गावडे यांच्याकडे सुरुवातीचे धडे घेतले. त्याला सणसर येथील जुने जाणते कै.पै.राजेंद्र बापू निंबाळकर, पै.पांडुरंग भाऊ निंबाळकर आणि पै.आबासाहेब टकले यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले.दहावी नंतर पुण्यातील आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलात प्रवेश घेऊन वस्ताद काकासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गेली चार वर्षे कठोर सराव केला. या काळात त्याने राष्ट्रीय स्पर्धेत एक ब्राँझ व एक सिल्व्हर पदक मिळवले. पुणे जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत २१ गदेचा मानकरी ठरला.



मुळशी केसरी स्पर्धेत गदा पटकावली असून दोन वेळा महाराष्ट्र केसरी स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे.यंदाच्या स्पर्धेत सिकंदर शेखसारख्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्याविरुद्ध दिलेली झुंज ही मनिषच्या जिद्दीची आणि मेहनतीची पावती मानली जात आहे. पराभव झाला असला तरी त्याच्या कामगिरीमुळे तो भविष्यातील आशादायी पैलवान म्हणून उदयास येत असल्याचे स्पष्ट झाले आहे.कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि गुरूंचे मार्गदर्शन यांच्या जोरावर पै.मनिष रायते येत्या काळात महाराष्ट्र केसरी किताबावर आपले नाव कोरू शकतो,असा विश्वास क्रीडाप्रेमी व सणसर ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

# सरकारच्या संवेदनाहीन धोरणाच्या निषेधार्थ धनगर समाज रस्त्यावर! लिंबागणेश येथे रास्ता रोको

**दैनिक युवक आधार**

**शेख महेशर ताहेर, पाटोदा :** धनगर समाजाला एस.टी. प्रवर्गातील आरक्षणाची अंमलबजावणी करावी या प्रमुख मागणीसाठी धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बो-हाडे यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर दि.१६ मार्चपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या दहाव्या दिवशी त्यांचे सासरे रामराव होळकर यांनी जालना येथील राहत्या घरी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.या घटनेनंतर धनगर समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून सरकारकडून केवळ आश्वासने देऊन वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप करण्यात आला. मंत्रीमंडळातील शिष्टमंडळाने भेट घेऊन चर्चा केली असली तरी ठोस निर्णय न घेतल्याने समाजात नाराजी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सरकारच्या संवेदनाहीन धोरणाच्या निषेधार्थ मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२६ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे अहमदपूर–अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनाची सुरुवात स्व. रामराव होळकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली.



सरकारच्या हलगर्जीपणामुळेच त्यांचा बळी गेला असल्याची तीव्र भावना व्यक्त करण्यात आली. या वेळी डॉ. गणेश ढवळे, रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मोरे पाटील, बाळासाहेब मुळे, शहादेव धलपे, कृष्णा पितळे आदींची समयोचित भाषणे झाली. विद्यार्थी गणेश ढगारे यांनी मनोगत व्यक्त केले.वक्त्यांनी सरकारने कोर्ट-कचेरी व समित्यांच्या प्रक्रियेत न अडकता धनगर आणि धनगड हे एकच असल्याचा शासन निर्णय तातडीने घ्यावा, तसेच राज्यपालांच्या स्वाक्षरीसह शिफारस पत्र राष्ट्रपतींकडे पाठवून आरक्षणाचा मार्ग मोकळा करावा जयअशी मागणी केली. निवेदन पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, विठ्ठल राठोड, गणेश परझने सहाय्यक फौजदार लिंबागणेश पोलिस चौकी, मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ आप्पा गिरे, शंकर वाणी, भगवान मोरे, गणपत तागड, बंकट लगास, भगवान मोरे, रामदास मुळे, गोवर्धन गिरे,ईश्वंभर मुळे, रोहित तागड, प्रविण मुळे, अर्जुन गिरे, रामकिसन गिरे, सुमंत मुळे, बंकट लगास, संदीप मुळे, बाबासाहेब गिरे, सतिश गिरे, केशव गिरे, श्रीराम तागड, आबा राहिंज, सुरेश निर्मळ, तुकाराम गायकवाड,गोरख मुळे, संजय पावले, रमेश गायकवाड, बापुराव पितळे, बंडु ढगारे, अमोल पितळे, हनुमंत वैद्य, अंकुश गिरे, लहु गिरे, लिंबाजी गिरे, श्रीहरी निर्मळ, परशुराम गायकवाड, अशोक जाधव, श्रीधर मुळीक, शहादेव कोल्हे, आप्पा मुळे, कल्याण कोकाटे, श्याम गिरे, सर्जेराव मुळे, रामचंद्र मुळे आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल ( अधिकारप्रदात्त स्वायत्त) येथे पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदात्त स्वायत्त) येथे पदवी, पदव्युत्तर आणि विद्यावाचस्पती प्राप्त वर्षाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे आयोजन सोमवार दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते सन्माननीय श्री. रामशेठ ठाकूर व प्रमुख पाहुणे म्हणून लखनऊ विद्यापीठ आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील माजी कुलगुरू, सन्माननीय प्रो.(डॉ.) एस. बी. निमसे हे उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन मा. श्री. वाय. टी. देशमुख , संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व आमदार मा. श्री. प्रशांत ठाकूर तसेच संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते मा. श्री. परेश ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे आणि संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे माननीय सदस्य आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे . या प्रसंगी चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. पाटील आणि विविध विभागांचे प्रमुख मंचावर मान्यवरांसोबत उपस्थित राहणार आहेत.या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्यामध्ये पदवी प्राप्त आणि विद्यावाचस्पती प्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि पदवी प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाचे समन्वयक डॉ. एस. एन. परकाळे, परीक्षा नियंत्रक प्रो.(डॉ.) एस. आय. उन्हाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव हे विशेष परिश्रम घेत आहेत.

## जाहिर प्रकटन

पुंडलिक रामा पाटील इंग्लिश स्कुल पाणदिवे

वंचित व दुर्बल घटकांच्या विद्यार्थ्यांसाठी आर.टी.इ २५% प्रवेश प्रक्रिया सुरु

शैक्षणिक वर्ष 2026 - 2027

प्रवेशाचा वर्ग - इयत्ता १ ली

प्रवेश संख्या- वर्गानुसार २५% जागा

कालावधी - दि. 03/03/2026 ते 17/3/2026

वंचित घटक S.C, S.T, O.B.C, जातीचे प्रमाण पत्र

दुर्बल घटक - OPEN - सन 2025-2026 किंवा 2026-2027 चे १ लाखा पेक्ष्या कमी उत्पन्न असलेला उत्पन्नचा दाखला

इतर कागद पत्र - रहिवासी पुरावा, जातीचे प्रमाण पत्र, विविद्यार्थाचा जन्माचा दाखला, आधारकार्ड, पालकांनी खालील लिंक वर ऑनलाईन फॉर्म भरावे -

https://student.maharashtra.gov.in/adm_portal/Users/rteindex

अधिक माहिती साठी शाळेच्या कार्यालयात संपर्क करावा, वेळ सकाळी 10 ते 12

**मुख्याध्यापक पुंडलिक रामा पाटील इंग्लिश स्कुल पाणदिवे**

# पिंपळस( रामाचे) येथिल जिल्हा परिषद शाळेत सूर्यनमस्कार उपक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी /विलास गायकवाड** : प्रभू श्रीराम नवमी महोत्सवानिमित्त व क्रीडा सह्याद्री फाउंडेशन आयोजित सामूहिक सूर्यनमस्कार व योगासने जि. प. प्राथमिक शाळा पिंपळस (रामाचे)च्या प्रांगणात उत्साहात संपन्न झाले. त्यामध्ये शाळेतील 251 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. याप्रसंगी शाळेच्या, मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. जीवनामध्ये सूर्यनमस्कार व योगा किती महत्त्वाचा आहे याबद्दल सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून विलास गायकवाड यांनी काम पाहिले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून 21 सामूहिक सूर्यनमस्कार व योगासने करून घेतले. योगासनामध्ये वृक्षासन ताडसन, पद्मासन हे योगासन घेण्यात आलेउपक्रम यशस्वी करण्याकरिता , शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने,राजेंद्र अहिरे, दिनेश पाटील,ज्ञानेश्वर उगले ,गोपाळ चव्हाण.संदिप गवते.सौ. संगिता कडलग,निता चौधरी. पल्लवी भडके ,,शिल्पा बोराडे,ज्योती कोकंदे सुनिता देवरे,माधुरी साळी, राखी हिरे, सरिता महाजन आदी उपशिक्षिका, पिंपळस रामाचे सरपंच, उपसरपंच, एसएमसी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व पालक उपस्थित होते. यावेळी रविंद्र उगले.



यांनी सूत्रसंचालन केले. क्रीडाशिक्षकज्वत्र शिव अविष्कार स्पोर्टस फाऊंडेशनचे क्रीडा सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड यांचेही या उपक्रमासाठी मार्गदर्शन लाभले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# बुटीबोरीच्या वृद्धाश्रमाला खाद्य सामग्री वितरित

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : अमर नगर ज्येष्ठ नागरिक मंडळ नागपूर च्यावतीने मंडळाचे अध्यक्ष देवीदास आगरकर व सचिव, वसंतराव इझनकर यांचे तर्फे ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे सचिव राजू मिश्रा यांच्या मार्गदर्शनात व उपस्थितीत पूर्णब्रह्म अभियाना अंतर्गत प्राप्त अंदाजे सात क्विंटल अन्नधान्य आणि इतर खाद्य सामग्री तथा साडेचार हजार रुपये नगदी बुटीबोरी येथील वृद्धाश्रमाला प्रदान करण्यात आले. अन्न धान्य वितरण कार्यक्रमाला अशोक सांभारे, डॉ.राजेश कुऱ्हाडे, विलास वाकडे, गणपतराव निंबाळकर, राजेश्वर डगरवार इत्यादी हजर होते.



# दिव्यांग वडिलांच्या प्रेरणेने उंच भरारी

## वेद म्हात्रे व अथर्व ठाकूर ठरले बेस्ट व्हिडियोग्राफर पुरस्काराचे मानकरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधि रणिता ठाकूर** : रायगडच्या भूमीत क्रीडा आणि सर्जनशीलतेचा संगम घडवणाऱ्या रायगड प्रीमियर लीग २०२६ पर्व ६ मध्ये यंदा एक प्रेरणादायी क्षण साकारला — “बेस्ट रील व्हिडियोग्राफर ऑफ रायगड” हा मानाचा पुरस्कार BAD BOY EDITS आणि AT CREATION या नावाने आपल्या कलेचा ठसा उमटवणाऱ्या वेद दीपक म्हात्रे आणि अथर्व ठाकूर यांना प्रदान करण्यात आला. या सन्मानात या दोघांचाही उल्लेखनीय सहभाग राहिला.

हा पुरस्कार केवळ उत्कृष्ट व्हिडियोग्राफीचा गौरव नाही, तर एका जिद्दी स्वप्नाचा, संघर्षमय प्रवासाचा आणि कुटुंबाच्या अथक पाठिंब्याचा भावनिक विजय आहे.वेद म्हात्रे यांची कहाणी मनाला स्पर्श करणारी आहे.




त्यांच्या वडिलांची — दीपक म्हात्रे ( दिव्यांग) — शारीरिक अडचणी असूनही त्यांनी कधीही आपल्या मुलाच्या स्वप्नांवर मर्यादा आणल्या नाहीत. उलट, प्रत्येक क्षणी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांनी त्याला उंच भरारी घेण्याची प्रेरणा दिली.

बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर वेदने पारंपरिक मार्ग न निवडता, आपल्या मनातील आवडीचा — क्रिएशन आणि व्हिडियोग्राफीचा — मार्ग स्वीकारला. हा निर्णय सोपा नव्हता, पण आई-वडिलांच्या विश्वासाने त्याच्या पावलांना बळ दिले.घरातील परिस्थिती साधी असली तरी स्वप्न मात्र मोठी होती. दिव्यांग वडिलांनी आपल्या मुलाच्या प्रत्येक इच्छेला जपून, त्याला योग्य मार्गदर्शन दिले आणि त्याच्या कलेवर विश्वास ठेवला. याच विश्वासाचे रूपांतर आजच्या यशात झाले आहे.

रायगड प्रीमियर लीगमध्ये वेदने सादर केलेल्या आकर्षक, भावनिक आणि प्रभावी रील्सनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या कॅमेऱ्याच्या नजरेतून प्रत्येक क्षण जिवंत झाला — आणि त्याच सर्जनशीलतेच्या जोरावर त्याने हा मानाचा किताब पटकावला. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल वेद म्हात्रे आणि अथर्व ठाकूर यांना रु. २१,०००/- रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले — ही केवळ रक्कम नसून, त्याच्या मेहनतीची आणि कलेची पावती आहे.

या स्पर्धेचे यशस्वी आयोजन महेश कडू आणि मित्र परिवार तसेच मंगेश वाकडीकर यांनी केले. त्यांनी तरुणांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ देत समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचे मोलाचे कार्य केले आहे.

वेद म्हात्रे यांची ही यशोगाथा फक्त एका पुरस्काराची कथा नाही — ती प्रत्येक स्वप्न पाहणाऱ्या तरुणासाठी एक संदेश आहे:

“परिस्थिती कितीही कठीण असो, जिद्द आणि कुटुंबाचा आधार असेल तर यश दूर नसते.”ही कहाणी आहे एका मुलाच्या स्वप्नांची...एका वडिलांच्या त्यागाची...आणि जिद्दीने मिळवलेल्या त्या गगनाला भिडलेल्या यशाची!

# भोंदूगिरीच्या माध्यमातून कोट्यवधींची संपत्ती उभारलेल्या अशोक खरात याच्या कथित आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे आता पनवेल तालुक्यातील शिरढोण गावापर्यंत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):** स्वतःला ‘कॅप्टन’ म्हणून सादर करत भोंदूगिरीच्या माध्यमातून कोट्यवधींची संपत्ती उभारल्याचा आरोप असलेल्या अशोक खरात याच्या कथित आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे आता पनवेल तालुक्यातील शिरढोण गावापर्यंत पोहोचल्याचा धक्कादायक खुलासा समोर आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खरातने काळ्या पैशांची गुंतवणूक करण्यासाठी पनवेल जवळच्या शिरढोण गावातील जमिनी मोठ्या प्रमाणात खरेदी केल्याचे आरोप होत आहेत. विशेष म्हणजे या जमिनी थेट त्याच्या नावावर न घेता नातेवाईकांच्या



नावावर घेतल्याचे समोर आले असून, संबंधित सातबारा नोंदीतही त्याची नोंद असल्याची माहिती आहे. या व्यवहारांमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याची चर्चा असून, या निधीचा स्रोत संशयास्पद असल्याचा आरोप केला जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, हे व्यवहार अत्यंत वेगाने पूर्ण करण्यात आले. यामध्ये महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांनी नियमांना बगल देत या प्रक्रियेला मदत केल्याची शक्यता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सामान्य नागरिकांची कामे महिनोनमहिने प्रलंबित राहतात, मात्र काही दिवसांत एवढ्या मोठ्या व्यवहारांची पूर्तता होणे आश्चर्यकारक असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून देण्यात येत आहे. पनवेल परिसरातील वाढत्या रिअल इस्टेट दरांचा फायदा घेत मोठ्या प्रमाणात जमीन खरेदी केल्याचा संशय व्यक्त होत असून, या संपूर्ण प्रकरणातील आर्थिक व्यवहार, निधीचा उगम आणि संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका याबाबत सखोल चौकशीची मागणी जोर धरत आहे.

# सिल्लोड आगार 'एसटी कामगार संघटने'च्या अध्यक्षपदी अजय गाडेकर, तर सचिवपदी संदीप इंगळे यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर सिल्लोड :-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील एकमेव मान्यताप्राप्त 'महाराष्ट्र एसटी कामगार संघटने'च्या सिल्लोड आगार शाखेची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. शुक्रवारी (दि. २७) पार पडलेल्या निवड प्रक्रियेत आगार अध्यक्षपदी अजय गाडेकर तर आगार सचिवपदी संदीप इंगळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

संघटनेचे प्रादेशिक सचिव बाबासाहेब साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विभागीय उपाध्यक्ष मनोज चंदनशिवे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड प्रक्रिया लोकशाही मार्गाने आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. नवनिर्वाचित सचिव संदीप इंगळे यांनी यापूर्वी दोन वेळा आगार अध्यक्षपद भूषवले असून, कामगारांच्या प्रश्नांवरील त्यांची आक्रमक मांडणी आणि प्रदीर्घ प्रशासकीय अनुभव संघटनेच्या



बळकटीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी मावळते अध्यक्ष नवलसिंग ठाकूर, मावळते सचिव दीपक पाथरीकर आणि ज्येष्ठ मार्गदर्शक वाहतूक निरीक्षक (वा.नि.) अशोक काळे यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या निवडीच्या वेळी सिल्लोड आगारातील चालक, वाहक आणि यांत्रिक विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकशाही पद्धतीने झालेल्या या निवडीमुळे कामगार वर्गात समाधानाचे वातावरण असून, सर्व स्तरांतून नूतन कार्यकारिणीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नगरसेविका लीना म्हात्रेच्या घराला आग; पैसे, दागिने, साहित्य जळाले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)** : खुटारी येथील भाजपचे नंदकुमार म्हात्रे यांच्या जी प्लस टू इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील घराला रात्री २४ मार्च रोजी आग लागली. या आगीत घरातील दागिने, पैसे , आणि साहित्य जळून खाक झाले.भाजपच्या नगरसेविका लीना म्हात्रे यांचे पती नंदकुमार म्हात्रे यांच्या घराला आग लागली. या आगीची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आल्यानंतर सिडको अग्निशामक दलाने ही आग पूर्णपणे विझवली. यावेळी कपाटातील दागिने, पैसे आणि घरातील कपाट, एसी, बेड , सोफा आणि इतर साहित्य जळाले. यावेळी दागिने, पैसे काढून म्हात्रे यांना देण्यात आले. किचनमधून सिलेंडरदेखील बाहेर काढण्यात आले. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवित हानी झाली नाही.



# महावितरणची मनमानी,थकबाकीच्या नावाखाली संपूर्ण गाव अंधारात

## थकबाकीच्या कारणावरून संपूर्ण गावाचा वीजपुरवठा बंद ; अधिकाऱ्यांची मनमानी की कायद्याचा अवमान?”

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे** : देगलूर (दि.२७) देगलूर तालुक्यातील दावणगीर येथे महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या कथित मनमानी कारभारामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, संपूर्ण गावाचा वीजपुरवठा बेकायदेशीरपणे खंडित करण्यात आल्याची गंभीर तक्रार समोर आली आहे.यामुळे नागरिक वैतागले असून,चालू महिन्यात वारंवार वीजपुरवठा बंद ठेऊन नागरिकांना वेठीस धरणाऱ्या करडखेड येथील शाखा अभियंत्यांच्या या मनमानी कारभाराची चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी ॲड.सद्दाम शेख दावणगीरकर यांनी कार्यकारी अभियंत्यांकडे दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार,३३ केव्ही उपकेंद्र करडखेड अंतर्गत येणाऱ्या दावणगीर गावात “९० टक्के वीजबिल थकीत आहे”या कारणावरून कोणतीही पूर्वसूचना न देता संपूर्ण गावाचा वीजपुरवठा बंद करण्यात आला.विशेष म्हणजे,दि.२४ मार्च २०२६ रोजी सायंकाळपासून मध्यरात्रीपर्यंत वीजपुरवठा पूर्णपणे खंडित करण्यात आला होता. तसेच,मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच वारंवार वीजपुरवठा कोणतीही सूचना न देता खंडित केला जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार,संबंधित शाखा अभियंता यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी “कधीकधी कायदा सोडून असे काम करावे लागते, तसेच तुम्हाला माहिती देता येणार नाही” असे उत्तर दिल्याचा धक्कादायक आरोप करण्यात आला आहे.या वक्तव्यामुळे अधिकाऱ्यांकडून कायद्याचा उघड अवमान होत असल्याची चर्चा रंगली आहे.दरम्यान, विद्युत कायद्याअंतर्गत संपूर्ण गावाचा वीजपुरवठा एकत्रितपणे खंडित करण्याची कोणतीही स्पष्ट तरतूद नसताना अशा प्रकारची कारवाई करण्यात आल्याने या निर्णयाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. याशिवाय,गावातील वीज वितरण व्यवस्थेची परिस्थितीही अत्यंत धोकादायक असल्याचे समोर आले आहे.अनेक ठिकाणी उघड्यावर डीपी,वाकलेल्या तारा आणि विद्युत खांबांवर चढलेल्या वेली यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.सध्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वीजपुरवठा खंडित झाल्याने पाणीटंचाई,उष्माघाताचा धोका,शेती व जनावरांचे नुकसान अशा अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.

त्यामुळे ही कारवाई केवळ बेकायदेशीरच नव्हे तर अमानवीय असल्याचा आरोप निवेदनात केला आहे.

# पनवेलमध्ये मलाबार ज्वेलरी फॅशन शो २०२६ दिमाखात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी** : नामांकित मलाबार ज्वेलरी आयोजित फॅशन शो २०२६ नुकताच पनवेल येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या शोमध्ये जवळपास ४० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवून आपले कौशल्य सादर केले.

स्पर्धेतील ‘मिस’ गटात अलका तापरानिया हिने विजेतेपद पटकावले, तर सुश्मिता हिला प्रथम क्रमांक आणि मेहेक खान हिला द्वितीय क्रमांक मिळाला. तिन्ही विजेत्यांना सॅश, ट्रॉफी आणि क्राऊन देऊन सन्मानित करण्यात आले.

त्याचप्रमाणे ‘मिसेस’ गटात मेघा घोडके हिने विजेतेपद मिळवले. अपूर्वा वंदिलें हिला प्रथम क्रमांक, तर श्वेता अहिरे हिला द्वितीय क्रमांक मिळाला. या विजेत्यांचाही सॅश, ट्रॉफी आणि क्राऊन देऊन गौरव करण्यात आला.

या शोमध्ये संपूर्ण मेकअप अक्षता लांगोटे आणि चारू सप्रे यांनी उत्कृष्टरीत्या सांभाळला, तर पायल गावंड यांनी आकर्षक वेस्टर्न आऊटफिट्स सादर केले. शोची कोरिओग्राफी शुभांगी खैरे यांनी केली. फोटोग्राफीची




जबाबदारी महेश बेलापूरकर यांनी पार पाडली, तर व्हिडिओग्राफी ‘युग’ यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिका राजगुडे यांनी प्रभावीपणे केले.

स्पर्धेचे परीक्षण स्वाती सोनावणे आणि अंकिता सक्सेना यांनी केले. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून प्रणया साळवी, पूनम सावंत, काजल चिकाने, पल्लवी दिवेकर आणि सौरभ भोईर उपस्थित होते. हे सर्वजण सोशल मीडियावर कंटेंट क्रिएटर म्हणूनही कार्यरत आहेत.या फॅशन शोमध्ये सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांनाही ट्रॉफी आणि क्राऊन देऊन सन्मानित करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट व्यवस्थापन मंदार काणे एंटरटेनमेंट चे सर्वेसर्वा मंदार काणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल त्यांनी मलाबार ज्वेलरीच्या संपूर्ण टीमचे आभार मानले.

# कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित वेतन व मृत कामगारांच्या लाभांबाबत सकारात्मक बैठक

## तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनचा पाठपुरावा यशस्वी

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनची कामगार आयुक्त, मुंबई तसेच महावितरण प्रशासन यांच्यासोबत महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला असोसिएशनचे राज्याध्यक्ष प्रभाकर लहाने व कार्याध्यक्ष विक्की कावळे उपस्थित होते.




बैठकी दरम्यान स्मार्ट सर्व्हिसेस व क्रिस्टल या कंत्राटी कंपन्यांच्या कामगारांच्या प्रलंबित वेतनाचा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. त्यावर स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीने जानेवारी २०२६ पर्यंतचे वेतन लवकरच अदा करण्यात येईल असे आश्वासन दिले, तर क्रिस्टल कंपनीने फेब्रुवारी २०२६ पर्यंतचे वेतन अदा केल्याची माहिती दिली. तसेच कंत्राटी कामगारांना नियमित व वेळेवर वेतन मिळावे यासाठी कामगार आयुक्तांनी संबंधितांना आवश्यक सूचना देण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली. इतर कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. याशिवाय मयत कंत्राटी कामगार केशव वाकुडकर व स्व. रामभाऊ बोरकर यांच्या कुटुंबीयांना मृत्यूनंतर मिळणारे आर्थिक लाभ तातडीने देण्यात यावे, अशी मागणी असोसिएशन तर्फे करण्यात आली. यावर संबंधित लाभ लवकरच देण्यात येतील. असे प्रशासनाकडून आश्वासन देण्यात आले. असोसिएशनतर्फे सांगण्यात आले की, कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी व न्यायासाठी संघटना भविष्यातही ठामपणे लढा देत राहील.

# रायगड ही शुरांची आणि लढवय्यांची भूमी : महेंद्रशेठ घरत

## महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे रायगड प्रीमियर लिगला फोर व्हिलर

**दैनिक युवक आधार**

**उलवे,प्रतिनिधी :** रायगड प्रीमियर लिगचे सोनारी येथे भव्य आयोजन करण्यात आले आहे. प्रकाशझोतातील सामन्यांसाठी मोठ्या प्रमाणात बक्षिसांची खैरात करण्यात आली आहे. विशेष म्हणजे रायगड प्रीमियर लिगमध्ये जो मालिकावीर होईल त्याला फोर व्हिलर मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे रायगड प्रीमियर लिगला फोर व्हिलर प्रोत्साहन म्हणून बक्षीस देण्यात आली आहे. रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या माध्यमातून आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने सोनारी येथे रायगड प्रीमियर लिगचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवारी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "क्रिकेटचा मी प्रचंड चाहता आहे. भारत-पाकिस्तान सामना बघण्यासाठी मी जगाच्या कानाकोपऱ्यात जातो, प्रत्यक्षात भारत-पाक सामना पाहणे हा परमोच्च आनंद असतो. एकप्रकारे ते चाहत्यांमध्येही युद्धच असते. घोषणाबाजी, हुल्लड, ईर्षा, आनंद या साऱ्यांचा मिलाफ भारत-पाक लढतींवेळी मी अनेक वेळा अनुभवला आहे. ग्रामीण भागात आता प्रकाशझोतातील सामन्यांचे पेव फुटले आहे. हे सामने खर्चिक असतात, पण खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून मी मदतीचा



हात कायम देत आलो आहे. रायगड ही शुरांची आणि लढवय्यांची भूमी आहे. त्यामुळे रायगड प्रीमियर लिगला मंगेश वाकडीकर यांच्या विनंतीनुसार फोर व्हिलर बक्षीस म्हणून ठेवली आहे. मंगेश वाकडीकर यांस कमी वयात जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची लॉटरी लागली आहे. याचा मला मनापासून आनंद आहे. त्यामुळे त्याच्या वाटचालीस माझ्या खूप खूप शुभेच्छा! राजकारणापलीकडे मी मैत्री जपतो आणि तरुणांना नोकऱ्या देतो. अनेक तरुणांत टॅलेंट आहे. क्रिकेटमधून अनेक तरुण करियर ही खडवत आहेत."

यावेळी जिल्हा परिषद सदस्य वैकुंठ पाटील, महेश कडू, रायगड ग्रामीण टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष राकेश गायकवाड, उपाध्यक्ष प्रशांत खानावकर आदी मान्यवर उपस्थित होते. रायगड प्रीमियर लीगचे आयोजनात व्यवस्थापक महेश कडू मित्र मंडळ आणि अचानक मित्र मंडळ यांनी मोलाची भूमिका निभावली आहे.

# दुय्यम निबंधक बी.बी. रिंडे यांचेवर कारवाई करावी; महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा-** साकोली येथील दुय्यम निबंधक बी.बी. रिंडे यांनी काबील कास्त प्रधानमंत्री घरकुल अज्ञान पालकधारक अकृषक आदेश नसलेल्या शेती धारकांची तसेच ३७ए, ३७बी सज्ञा लागू असलेल्या शेतकऱ्यांची शेतजमीन आर्थिक देवाणघेवाणीतून बेकायदेशीर केलेल्या दस्त नोंदणीची चौकशी करून दस्त नोंदणी रद्द करावी. तसेच महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार दुय्यम निबंधक बी.बी. रिंडे यांचेवर कारवाई करण्यात यावी. या करिता सामाजिक कार्यकर्ता कैलास गेडाम यांचे नेतृत्वात तहसीलदार साकोली मार्फत मंगळवार(ता.२४ मार्च) महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. महसूल मंत्र्यांकडून काय कारवाई केली जाते. याकडे तालुका वासियांचे लक्ष लागले आहे.

दुय्यम निबंधक बी.बी. रिंडे यांचे कार्यकाळात बोगस दस्ताऐवजाच्या आधारे दस्त नोंदणीतील अर्जदारांना ब्लॅकमेल करून बेकायदेशीर प्रमाणपत्र तयार करून अनेकांची फसवणूक केली आहे. तसेच अर्थकारण करून काबील



कास्त वर्ग २ ची शेती प्रधानमंत्री आवास योजनेची घरकुल विक्री तसेच तहसीलदाराचे मनाई आदेश असलेल्या शेतीची दस्त नोंदणी या शिवाय ३७ए व ३७बी सज्ञा असलेल्या आदिवासीच्या जमिनीची दस्त नोंदणी या शिवाय अकृषक आदेश नसलेल्या व नकाशा मंजूर नसलेल्या जमिनीचे बोगस पद्धतीने प्लॉट दस्त नोंदणी करून देणे तसेच अज्ञान पालक असलेल्या शेती धारकांचे खोटे आधार कार्ड व वयाच्या प्रमाणपत्राच्या आधारे दस्त नोंदणी केली असल्याचे निवेदनात नमूद आहे. दस्त नोंदणी क्रमांक ९४५/२०२४ दिनांक ४/१०/२०२४ च्या गट क्रमांक ९६ ची दिवाणी न्यायालय साकोली येथे प्रकरण सुरू असताना तसेच तहसीलदार साकोली यांचे दस्त नोंदणीस मनाई करणारे पत्र असताना अर्थकारण करून दस्त नोंदणी केली आहे. तसेच साकोली/सेंदुरवाफा मालमत्ता क्रमांक २९३१ दस्त नोंदणी क्रमांक ११६९/२०२५ दिनांक २८/१०/२०२५ नुसार प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलाची दस्त नोंदणी केली आहे. तसेच गोंडउमरी, तालुका साकोली येथील गट क्रमांक ४१३ ची अकृषक परवानगी नसतांना व नगररचना विभागाकडून नकाशा मंजूर नसतांना बोगस दस्ताऐवजाच्या आधारे लाखो रुपये घेऊन दस्त क्रमांक ५२५/२०२३ नोंदणी केली. तसेच जमनापूर तलाठी साझा क्रमांक १२ येथील गट क्रमांक ४१४ चे मालक अनुसूचित जमाती प्रवर्गातील असताना सुद्धा आदिवासी नाहीत असे बोगस प्रमाणपत्र तयार करून दस्त नोंदणी करून दिली.

दुय्यम निबंधक बी. बी. रिंडे साकोली येथे रुजू झाल्यापासून अनेक काबील कास्त, वर्ग २ च्या शेतजमिनी बनावट दस्ताऐवजाच्या आधारे नोंदणी केली. तसेच शासकीय जागेवरील अतिक्रमित असलेल्या जागेचे बक्षिसपत्र आणि अज्ञान पालक असलेल्या शेतजमिनीची दस्त नोंदणी करून दिली असल्यामुळे सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी बी.बी. रिंडे यांचे कार्यकाळातील निरीक्षण टिप्पणीची चौकशी करून नियमबाह्य नोंदणी केलेले दस्त रद्द करण्यात यावे. या करिता सामाजिक कार्यकर्ता कैलास गेडाम यांचे नेतृत्वात तहसीलदार साकोली मार्फत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. कैलास गेडाम, डी. वाय. बडोले, विलास मेश्राम, अविनाश रंगारी, प्रमोद मेश्राम, स्वप्नील गजभिये, चिरंजीव बारसागडे, सुरेश मेश्राम, सोनू राऊत, अमृत राऊत यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# छत्रपती संभाजीनगरात महात्मा फुले जयंती उत्सवासाठी पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर







**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर :** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या सार्वजनिक उत्सवाच्या पूर्वनियोजन बैठकीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. "क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६" च्या वतीने ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

ही जयंती महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच यंदाच्या समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे संस्थापक अध्यक्ष विशाल बाबासाहेब पुंड यांनी पुढीलप्रमाणे पदाधिकाऱ्यांची घोषणा केली —

अध्यक्ष : बाबूलाल मगर
कार्याध्यक्ष : प्रविण गाडेकर
स्वागताध्यक्ष : अशोक दामले
सरचिटणीस : ताराचंद गायकवाड
कोषाध्यक्ष : आसाराम वीरकर
प्रसिद्धीप्रमुख : विलास ढंगारे

यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमुखाने यंदाची जयंती अधिक भव्य, जल्लोषपूर्ण आणि उत्साहात साजरी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या बैठकीला ज्येष्ठ मार्गदर्शक रामभाऊ पेहरकर, जयवंत गायकवाड, शिरसे काका, विजय वाघमारे, बाबासाहेब पुंड, नितीन खरात, शैलेश हेकडे, कल्याण रंधे, महेश सत्रे, सोनवणे सर, भालचंद्र गायकवाड, अशोक गोरे, बाबासाहेब जाधव, शैलेश इंगळे, भाऊसाहेब वाघमारे, मनोज सोनवणे, पांडव सर, दिलीप जायकर, ईश्वर सोनवणे, गणेश धोंगडे, किरण राऊत, रामचंद्र जाधव, दिलीप खाटे, हरिभाऊ पवार, कानिफनाथ चौधरी, लक्ष्मण उगले, महाजन सर, योगेश गाडेकर, दत्ता तारो, विजय काळे, अजिंक्य घोडके, गितेश ससाणे, अजय हापत, प्रदीप जाधव, दीपक कडवे, नाना, शारदा ताई कोथिंबीरे, रोहिणी काळे, मंजुषा महाजन, गायकवाड ताई, गायकवाड मॅडम, अंजली पुंड आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री साहेब, शेतरस्ता अडवल्यानंतर फार्मर आयडी, आधार कार्ड ब्लॉक, खरंच कारवाई होणार का? शेतकऱ्यांना न्याय मिळणार का? :- डॉ .गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी व शेतीमालाच्या वाहतुकीसाठी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद/ शेत रस्ते योजना' प्रभावी करण्यासाठी सुधारित शासन आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, शेतरस्ता अडविणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्यात येणार असून त्याचा शासकीय योजनांवरील लाभ बंद केला जाणार आहे. तसेच फार्मर आयडी आणि आधार कार्ड ब्लॉक करण्याची तरतूद करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दंडासह पुढील पाच वर्षे सर्व शासकीय योजनांपासून वंचित ठेवण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

मात्र, ग्रामीण भागात प्रत्यक्ष परिस्थिती वेगळीच दिसून येत आहे. शेतरस्त्यांच्या वादातून भांडणे, तणाव आणि पोलिसांत गुन्हे दाखल होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी वारंवार लेखी तक्रारी करूनही त्यांना वेळेत न्याय मिळत नसल्याच्या घटना समोर येत आहेत. त्यामुळे शासनाचा हा कठोर



आदेश प्रत्यक्षात प्रभावीपणे अंमलात येणार की नेहमीप्रमाणे कागदोपत्रीच राहणार, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी उपस्थित केला आहे. एकीकडे शासन कडक निर्णय जाहीर करत असताना दुसरीकडे प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरत आहे.

**तक्रार करूनही रस्ता मोकळा नाही, शिवचरण नाईगडे यांची खंत**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील गट क्रमांक ३८५ व ३८६ मध्ये शेतजमीन असलेल्या शिवचरण महादेव नाईगडे यांच्या शेताकडे जाणारा सुमारे ३५ वर्षांपासूनचा शेतरस्ता महिनाभरापूर्वी शेजाऱ्यांनी खोदून व बांध भरून अडवला आहे. दिनांक ११ मार्च रोजी लिंबागणेश येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरात त्यांनी चंद्रकांत शेळके यांना लेखी निवेदनाद्वारे रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली होती. त्यावेळी आश्वासन मिळाले, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. दरम्यान, तहसीलदारांना भेटण्यासाठी बीड कडे जात असताना त्यांच्या आईचा अपघात झाला होता. तरी ही न्यायासाठी आज पुन्हा आईला बीडला जावे लागत असल्याची खंत शिवचरण नाईगडे यांनी व्यक्त केली आहे.

# जयभवानीत लिंग समानता, महिलांचे कायदेशीर हक्क आणि पॉश कायदा-२०13 या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा अंतर्गत महिला तक्रार समिती आयोजित एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :-** पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या वतीने दिनांक २७ मार्च २०२६ रोजी 'लिंग समानता : महिलांचे कायदेशीर हक्क आणि पॉश कायदा-२०१३' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन श्री.शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गढी येथील प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते. तर प्रमुख पाहुण्या म्हणून पाटोदा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील ॲड.श्रीमती श्वेता किशोर राख आणि ॲड.श्रीमती




दिपाली पांडव या उपस्थित होत्या. या वेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा.विनोद किर्दक आणि कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या सत्काराने झाली. उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी महिलांचे हक्क, कायदे आणि समाजातील त्यांचे स्थान यावर भाष्य केले. महिलांनी आपल्या हक्कांविषयी जागरूक राहून आत्मविश्वासाने पुढे यावे, असे त्यांनी आवाहन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या पिठासीन अधिकारी प्रा.ज्योती रकटे यांनी केले. त्यांनी लिंग समानता आणि महिलांचे कायदेशीर हक्क यांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास समाज अधिक सुरक्षित, समतोल आणि प्रगत होईल, असे स्पष्ट केले. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात ॲड.श्रीमती दिपाली पांडव यांनी 'लिंग समानता' या विषयावर सखोल मार्गदर्शन करत स्त्री-पुरुष समानतेचे महत्त्व अधोरेखित केले. महिलांचे सशक्तीकरण हे समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. द्वितीय सत्रात ॲड.श्रीमती श्वेता राख यांनी 'महिलांचे कायदेशीर हक्क तसेच पॉश कायदा-२०१३' विषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया आणि आंतरगर्त तक्रार समितीची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांनी कार्यशाळेतील विषयांचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी व महिलांनी कायद्यांची माहिती करून घेणे आणि त्यांचा योग्य वापर करणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ.वंदन जाधव यांनी मानले. या कार्यशाळेमुळे उपस्थितांना लिंग समानता, महिलांचे हक्क आणि कार्यस्थळी सुरक्षिततेविषयी उपयुक्त माहिती मिळाली. या कार्यशाळेला सर्व प्राध्यापक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.

# नवी मुंबईत न्यूईरा हॉस्पिटलचे 'ॲलर्जी क्लिनिक' सुरू; १५० ॲलर्जन्स तपासणीचा घेता येणार लाभ

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई :** वाढत्या ॲलर्जीच्या समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून न्यूईरा हॉस्पिटलने नवी मुंबईत अत्याधुनिक सोयीसुविधांयुक्त 'ॲलर्जी क्लिनिक' सुरू केले आहे. या क्लिनिकअंतर्गत रुग्णांसाठी एक विशेष 'ॲलर्जी पॅकेज'तयार करण्यात आले असून,यातंर्गत एकाच पॅनेलमध्ये तब्बल १५० ॲलर्जन्सची तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यामुळे कमी खर्चात अचूक निदान आणि प्रभावी उपचार व्यवस्थापन शक्य होणार आहे.

ॲलर्जीची लक्षणांकडे बऱ्याचदा दुर्लक्ष केले जाते किंवा त्यावर चुकीच्या पद्धतीने उपचार केले जातात ज्यामुळे रुग्णांना दीर्घकाळ त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेले हे क्लिनिक अन्न, पर्यावरण आणि जीवनशैलीशी संबंधित विविध प्रकारच्या ॲलर्जींचे अचूक निदान करण्यास मदत करणार आहे. यामुळे रुग्णांना त्यांच्या ॲलर्जीचे मूळ कारण (ट्रिगर्स) ओळखता येईल आणि त्यानुसार वैयक्तिक उपचार योजना आखता येतील.




या क्लिनिकचे उद्घाटन डॉ. अमिश वाखलू (ईएनटी आणि हेड ॲण्ड नेक सर्जन), डॉ. चंद्रशेखर टी. (क्रिटिकल केअर मेडिसिन), डॉ. निशांत तावडे (इंटरनल मेडिसिन) आणि डॉ. मनीष पेंडसे (फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. सुनील कुट्टी (संस्थापक संचालक - ब्रेन आणि स्पाइन सर्जरी) आणि डॉ. माताप्रसाद गुप्ता (उपाध्यक्ष आणि सीईओ) यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. अमिश वाखलू (ईएनटी आणि हेड ॲण्ड नेक सर्जन) सांगतात की,* अनेकदा ॲलर्जीकडे दुर्लक्ष केले जाते, त्यामुळे वारंवार लक्षणं जाणवू लागतात आणि अस्वस्थता निर्माण होते. या क्लिनिकमुळे अन्न, श्वसनमार्गासंबंधी ॲलर्जी (जसे की धूळ, परागकण आणि पाळीव प्राण्यांचे केस) आणि त्वचेशी संबंधित ॲलर्जींचे अचूक निदान करता येणार आहे. एकाच पॅनेलमध्ये विविध तपासण्या उपलब्ध असल्याने वेळ वाचेल आणि अचूक उपचार घेणे शक्य होईल.

डॉ. माताप्रसाद गुप्ता (उपाध्यक्ष आणि सीईओ) यांनी सांगितले की,* रुग्णांना अत्याधुनिक आणि परवडणाऱ्या आरोग्यसेवा देण्याचा रुग्णालयाचा प्रयत्न आहे. या ॲलर्जी क्लिनिकमुळे रुग्णांना वेळीच निदान, योग्य उपचार आणि उत्तम आरोग्य मिळण्यासाठी नक्कीच मदत होईल.

न्यूईरा हॉस्पिटलचा हा उपक्रम प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेकडे टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात असून, ॲलर्जीच्या वाढत्या समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी तो उपयुक्त ठरणार आहे.

## नवोन्मेषी उपचारपद्धतीवर भर गरजेचा – पल्स–२०२६ परिषदेत तज्ज्ञांचे मत

**मुंबई :** भारतासह जगभरात दीर्घकालीन आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, पारंपरिक उपचार पद्धतींपलीकडे जाऊन सहकार्यात्मक व नवोन्मेषी उपचार पद्धतींवर भर देणे गरजेचे आहे. यासाठी आरोग्य क्षेत्रातील आघाडीवर काम करणाऱ्या तज्ज्ञांनी एकत्र येऊन विचारमंथन करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत तज्ञांनी केले.

वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग आयोजित “पल्स” २०२६ या कार्यक्रमात “दीर्घकालीन आजारांच्या उपचारासाठी नव्या आरोग्य सेवा पद्धती” या विषयावर आयोजित चर्चासत्रात डॉ.संगीता रावत, डॉ.सोनालिनी खेत्रपाल, डॉ. विनिता सबनीस-मंजुरे, डॉ .अपर्णा बेलापूरकर तसेच डॉ. रिचा सिंह यांनी मत व्यक्त केले.

या चर्चासत्रात डिजिटल आरोग्य, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), टेलिमेडिसिन, तसेच रुग्ण-केंद्रित उपचार पद्धतींचा वापर यावर विशेष भर देण्यात आला. आयआयटी मुंबई येथील डिजिटल हेल्थ सेंटरच्या प्रतिनिधींनी तंत्रज्ञान, डेटा सायन्स आणि वैद्यकीय क्षेत्र यांच्या संगमातून आरोग्य व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणता येईल, असे नमूद केले.

सार्वजनिक रुग्णालयांतील अनुभव मांडताना तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले की, दीर्घकालीन आजारांवर मात करण्यासाठी बहुआयामी (मल्टी-डिसिप्लिनरी) टीमवर्क आणि रुग्णांच्या उपचारांमध्ये सातत्य राखणे अत्यावश्यक आहे. मोठ्या रुग्णसंख्येमुळे ही प्रक्रिया आव्हानात्मक असली तरी, एकाच डॉक्टरकडून सातत्याने उपचार मिळाल्यास रुग्णांची स्थिती अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येते.

आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत तज्ज्ञांनी सांगितले की, युनायटेड किंगडमसारख्या देशांमध्ये रुग्ण-केंद्रित ‘पाथवे बेस्ड’ उपचार पद्धती प्रभावी ठरली आहे. रुग्णालयातील उपचारांपासून ते पुनर्वसन आणि समाजात पुनर्स्थापना यापर्यंत संपूर्ण प्रवास एकात्मिक पद्धतीने हाताळला जातो. तसेच ‘शेअर्ड केअर रेकॉर्ड्स’मुळे विविध विभागांमध्ये समन्वय साधणे सुलभ होते.

डिजिटल आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी टेलिमेडिसिन, रिमोट पेशंट मॉनिटरिंग आणि इलेक्ट्रॉनिक मेडिकल रेकॉर्ड्स (ईएमआर) हे दीर्घकालीन आजार व्यवस्थापनातील महत्वाचे साधन असल्याचे सांगितले. कोविड-१९ नंतर ऑनलाइन सल्लामसलतींचा स्वीकार मोठ्या प्रमाणात वाढला असून, दुर्गम भागांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्यात याचा मोठा फायदा होत आहे.

# जिल्ह्यात कॅन, बाटली मध्ये पेट्रोल–डिझेल विक्रीवर निर्बंध

## जिल्हाधिकारी डॉ इंदु राणी जाखड यांनी आदेश केले पारित

**पालघर :** समाजमाध्यमांवर पेट्रोल-डिझेलच्या संभाव्य तुटवड्याबाबत पसरत असलेल्या अफवांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ इंदु राणी जाखड यांनी तातडीची पावले उचलत निर्बंध लागू करण्यासाठी आदेश पारित केले . सार्वजनिक सुरक्षितता आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात पेट्रोलसारख्या ज्वलनशील पदार्थाची मुक्त विक्री झाल्यास अनुचित घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी डॉ इंदु राणी जाखड यांनी पेट्रोल-डिझेल विक्रीसंदर्भात महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. पेट्रोलियम नियम, २००२ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करत हे आदेश तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आले आहेत.

**आदेशातील मुख्य निर्देश**

पेट्रोल व डिझेल केवळ वाहनांच्या इंधन टाकीतच भरणे बंधनकारक

कॅन, बाटली, डबा किंवा इतर कोणत्याही भांड्यात विक्रीस सक्त मनाई

सर्व पेट्रोल पंपांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवणे बंधनकारक

विक्री नोंदी नियमितपणे अद्ययावत ठेवण्याचे आदेश

**नियमभंग केल्यास कडक कारवाई**

अनधिकृत साठा किंवा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर ‘जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५’, ‘भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३’ तसेच ‘आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५’ अंतर्गत कठोर दंडात्मक आणि फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही आदेशामध्ये दिला आहे. जिल्हाधिकारी डॉ इंदु राणी जाखड यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. “जिल्ह्यात इंधनाचा पुरवठा सुरळीत असून घाबरण्याचे कारण नाही. नियमांचे पालन करणे हेच सर्वांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे आहे,” असे त्यांनी नमूद केले.

समाज माध्यमांवर पेट्रोल डिझेलच्या संभाव तुटवड्या बाबत पसरत असलेल्या अफवांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी बीपीसीएल आयओसीएल एचपीसीएल रिलायन्स व नायरा या कंपनीचे सेल्स ऑफिसर्स तसेच पेट्रोल डीलर असोसिएशन अध्यक्ष, हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष ,गॅस वितरण कंपनी जिल्ह्याचे नोडल अधिकारी यांच्या समवेत तातडीने बैठक घेतली

# रसच्या रंगतदार दुनियेत हरवलेलं मन; खरेदीसोबत प्रेरणेचीही मेजवानी!”

वाशीच्या CIDCO Exhibition Centre मध्ये भरलेला ‘महालक्ष्मी सरस’ सोहळा… आणि त्या सोहळ्याला दिलेली माझी कालची भेट — केवळ एक फेरफटका नव्हता, तर ग्रामीण जिद्दीचा, स्त्रीशक्तीचा आणि स्वावलंबनाच्या प्रवासाचा जिवंत साक्षात्कार होता.

प्रदर्शनात पाऊल टाकताच जाणवलेली ऊर्जा वेगळीच होती. धुपबत्तीचा दरवळ, रंगीबेरंगी स्टॉल्स आणि गर्दीतूनही जाणवणारा आत्मविश्वास—हे सगळं काही वेगळंच सांगत होतं. प्रत्येक स्टॉल हा केवळ विक्रीचा नव्हता, तर ‘उमेद’ आणि ‘लखपती दीदी’ या उपक्रमांतून उभ्या राहिलेल्या स्वप्नांचा आरसा होता.

या प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाचे अध्यक्ष Narendra Patil यांनी व्यक्त केलेले विचार मनाला भिडणारे होते. ‘उमेद’ अभियान आणि ‘लखपती दीदी’ उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना स्वावलंबनाची नवी दिशा मिळत आहे, ही बाब प्रत्यक्ष इथे अनुभवता आली. गावागावातून आलेल्या बचत गटांच्या महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना इथे शहरी बाजारपेठ मिळत आहे—ही केवळ संकल्पना नाही, तर वास्तवात साकारलेली क्रांती आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर Sujata Suraj Patil यांनीही








व्यक्त केलेली भावना इथे प्रत्येक ठिकाणी जाणवत होती—“महिला सक्षम झाली तर समाज आणि देश अधिक बळकट होतो.” खरंच, इथल्या प्रत्येक महिलेमध्ये जिजाऊ, सावित्रीबाई फुले आणि अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याची प्रेरणा दिसत होती.

स्टॉल्सवर फिरताना राजश्री गणोरकर यांच्या धुपबत्त्यांपासून ते सिंधू कुंभार यांच्या मातीच्या कलाकृतींपर्यंत, प्रत्येक वस्तूमध्ये कष्टांची ऊब होती. शिल्पा सावंत यांच्या नैसर्गिक सौंदर्यप्रसाधनांमध्ये निसर्गाची साद होती, तर कांचन-योगिता पाटील यांच्या ‘आजीची गोधडी’मध्ये मायेचा स्पर्श. हे सगळं पाहताना जाणवलं—या वस्तू विकल्या जात नाहीत, त्या अनुभव म्हणून घरी नेल्या जातात.

खाद्यपदार्थांच्या विभागात तर महाराष्ट्राची चव खुलून दिसत होती. पूर्वा रणदिवे, कालिंदा सुरवसे, कांचन गजमल, उषा धुतारगाव यांसारख्या महिलांनी त्यांच्या कष्टातून तयार केलेल्या पदार्थांनी “घरगुती चव” आणि “विश्वास” या दोन गोष्टी एकत्र आणल्या होत्या.

या सगळ्या अनुभवामागे ‘उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान’चे भक्कम कार्य उभे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी Nilesh Sagar यांनी सांगितल्याप्रमाणे, 2011 पासून सुरू झालेल्या या अभियानाने लाखो महिलांना स्वावलंबी बनवले आहे. आज राज्यातील 6 लाखांहून अधिक स्वयं सहायता समूह, हजारो ग्रामसंघ आणि लाखो कुटुंब या चळवळीचा भाग झाले आहेत. ‘उमेद मॉल’ आणि ‘उमेद मार्ट’सारख्या संकल्पनांमुळे महिलांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध होत आहे—हे या प्रदर्शनातून स्पष्ट जाणवत होते.

अवर सचिव Dhanvant Mali यांनी दिलेली आकडेवारी या कार्याची भव्यता अधोरेखित करणारी आहे—कोट्यवधी रुपयांचा पतपुरवठा, लाखो कुटुंबांचा सहभाग आणि हजारो उत्पादक गटांची निर्मिती… ही केवळ संख्या नाही, तर उभारी घेतलेल्या आयुष्यांची साखळी आहे.

या प्रदर्शनात फिरताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली—‘सरस’ म्हणजे बाजारपेठ नाही, तर परिवर्तनाचा उत्सव आहे. इथे प्रत्येक महिला ‘लखपती दीदी’ होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि तिच्या डोळ्यांत स्वप्नांबरोबर आत्मविश्वासही चमकत आहे.

२४ मार्च ते ४ एप्रिल २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या या ‘महालक्ष्मी सरस’ प्रदर्शनाला प्रत्येकाने आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन पुन्हा एकदा मनापासून करावेसे वाटते. कारण इथे केवळ खरेदी होत नाही—इथे स्वप्नांना हात दिला जातो, जिद्दीला सलाम केला जातो आणि ‘सक्षम महिला, विकसित महाराष्ट्र’ या संकल्पनेचा जिवंत अनुभव घेतला जातो.

## महाराष्ट्रात केरोसीन वितरणाबाबत नवीन शासन निर्णय; सर्वसामान्यांसाठी दिलासादायक पाऊल

जागतिक भू-राजकीय परिस्थितीमुळे सध्या एलपीजी (LPG) गॅसचा तुटवडा भासत आहे. या पार्श्वभूमीवर, केंद्र आणि राज्य सरकारने सर्वसामान्य नागरिकांच्या इंधनाची गरज ओळखून एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने 25मार्च 2026 रोजी काढलेल्या आदेशानुसार, राज्यात तात्पुरत्या स्वरूपात केरोसीनचे वितरण करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

**1. केरोसीन वाटपाचे स्वरूप आणि प्रमाण**

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी एकूण 3 हजार 744 कि.ली. (37 लाख,44 हजार लिटर) केरोसीनचा कोटा मंजूर केला आहे.

या वाटपाचे मुख्य नियम खालीलप्रमाणे आहेत.

•प्रति कुटुंब मर्यादा : प्रत्येक पात्र शिधापत्रिकाधारकास किंवा कुटुंबाला 3 लिटर केरोसीन दिले जाईल.

•वितरण कालावधी : हे वितरण प्रामुख्याने मार्च 2026 मध्ये केले जाणार आहे.

•उचल बंधनकारक : वाटपाच्या तारखेपासून 45 दिवसांच्या आत संपूर्ण केरोसीनची उचल करणे आवश्यक आहे, अन्यथा ते पुढे हस्तांतरित (Carry forward) केले जाणार नाही.

**2.लाभार्थी आणि प्राधान्यक्रम केरोसीन वितरणासाठी शासनाने स्पष्ट नियमावली जाहीर केली आहे:**

•प्रथम प्राधान्य : अंत्योदय अन्न योजना (AAY) आणि प्राधान्य कुटुंब (PHH) शिधापत्रिकाधारकांना वितरणात अग्रक्रम दिला जाईल.

•इतर पात्र घटक : केरोसीन उपलब्ध असल्यास श्वेतपत्रिकाधारक, शिधापत्रिका नसलेली कुटुंबे (ग्रामपंचायत रहिवासी दाखला आवश्यक) आणि स्थलांतरित मजूर (शासकीय ओळखपत्र आवश्यक) यांनाही वितरण केले जाऊ शकते.

**3. जिल्हावार वाटप आणि व्यवस्थापन**

राज्यातील विविध जिल्ह्यांच्या मागणीनुसार केरोसीनचे वाटप करण्यात आले आहे. काही प्रमुख जिल्ह्यांचे वाटप खालीलप्रमाणे आहे.

नाशिक : 228 कि.ली. (सर्वाधिक)

अहिल्यानगर : 216 कि.ली.

पुणे ग्रामीण : 204 कि.ली.

जळगाव,कोल्हापूर,नांदेड : प्रत्येकी 156 कि.ली.

ठाणे : 48 कि.ली.

**तेल कंपन्यांचा सहभाग :**

हे वाटप IOCL (1 हजार 584 कि.ली.), BPCL (1 हजार 8 कि.ली.) आणि HPCL (1 हजार 152 कि.ली.) या तीन मुख्य कंपन्यांमार्फत केले जाईल.

**4. वितरण प्रक्रिया आणि खबरदारी**

हे वितरण पारदर्शक व्हावे यासाठी शासनाने कडक सूचना दिल्या आहेत:

•नोंदणी : रास्त भाव दुकानदार आणि किरकोळ विक्रेत्यांनी वितरणाच्या नोंदी ऑफलाईन (भौतिक नोंदवहीमध्ये) अद्ययावत ठेवणे बंधनकारक आहे.

•दर : केरोसीनच्या दराबाबत आणि विक्रेत्यांच्या कमिशनबाबत शासन स्वतंत्र आदेश लवकरच निर्गमित करणार आहे.

•भेसळ रोखण्यासाठी उपाय : पेट्रोल किंवा डिझेलमध्ये केरोसीनची भेसळ होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासनाचे ‘संयुक्त निरीक्षण पथक’ तैनात करण्यात येणार आहे.हे केरोसीन वाटप तात्पुरत्या स्वरूपाचे असून, मागणी आणि प्रतिसादानुसार यामध्ये भविष्यात बदल केले जाऊ शकतात.एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या ग्रामीण आणि गरजू कुटुंबांसाठी हा निर्णय मोठा आधार ठरणार आहे. विशेषतः ज्यांच्याकडे गॅस कनेक्शन नाही किंवा जे स्थलांतरित आहेत, त्यांना 3 लिटर केरोसीन उपलब्ध करून देऊन शासनाने एक प्रभावी पर्यायी व्यवस्था उभी केली आहे.

**ठाणे जिल्ह्यात प्रति कुटुंब 3 लिटरचा कोटा निश्चित..**

केंद्र सरकारच्या 12 मार्च 2026 च्या आदेशानुसार, एलपीजीला तात्पुरता पर्याय म्हणून केरोसीनचे (घासलेट) वाटप करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.या निर्णयांतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी एकूण 37 लक्ष 44 हजार लिटर ( 3 हजार 744 KL) केरोसीनचा साठा मंजूर करण्यात आला असून, त्यातील 48,000 लिटरचा (48 KL) वाटा रायगड जिल्ह्याला मिळाला आहे. ठाणे जिल्ह्यासाठी मंजूर झालेल्या 48 किलो लिटर साठ्याच्या वाहतुकीसाठी एकूण 4 टँकरला परवानगी देण्यात आली आहे. मार्च आणि एप्रिल 2026 या महिन्यांसाठी तालुकानिहाय मागणीनुसार हे वाटप केले जाणार आहे. दरम्यान, केरोसीनच्या विक्री दराबाबतचे स्वतंत्र आदेश शासन स्तरावरून लवकरच निर्गमित केले जातील, असे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी कळविले आहे.या संदर्भातील अधिक माहितीसाठी नागरिक आपल्या जवळच्या रास्त भाव दुकानात किंवा तहसील कार्यालयात संपर्क साधू शकतात.

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**ठाणे / रायगड**
**तथा**
**प्र.उपसंचालक,**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.**

## बाजारात मिळणारे भेसळयुक्त मसाले टाळा; घरीच अशी करा लागवड

मसाल्यांशिवाय जेवणाला चव येत नाही. त्यातच बाजारात मिळणारे मसाले हे अनेकदा भेसळयुक्त आणि महागडे असतात. बाजारात मिळणारे भेसळयुक्त मसाले टाळायचे असतील आणि शुद्ध, सुगंधी मसाल्यांचा वापर करायचा असेल तर टेरेस, बाल्कनी किंवा छोट्या किचन गार्डनमध्ये काही मसाले सहज वाढवता येतात. कमी खर्चात आणि कमी जागेत या झाडांची लागवड करून तुम्ही वर्षभर ताजे मसाले मिळवू शकता. या मसाल्यांची लागवड करण्याची सोपी पद्धत जाणून घेऊया…

**आलं**

मार्च-एप्रिल हा आल्याची लागवड करण्यासाठी सर्वोत्तम काळ मानला जातो. कारण थोडे उष्ण हवामान आल्याची वाढीसाठी अनुकूल असते. तसेच आलं हे दैनंदिन वापरातील मसाला असून औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. त्याची लागवड करण्यासाठी किंचित सुकलेले, जाड आलं लहान तुकड्यांमध्ये कापून सैल, सुपीक मातीत पेरावे. आल्याला वाढण्यासाठी थोड्या जास्त जागेची आवश्यकता असते. म्हणून त्यासाठी एक मोठी कुंडी निवडा. आल्याचे पीक येण्यासाठी ६ ते ८ महिने लागू शकतात. आल्याला हवेशीर आणि सूर्यप्रकाश येईल अशा ठिकाणी ठेवा. माती कोरडी



झाली की त्याला पाणी देणे पुरेसे असते.

**हिरव्या मिरच्या**

अनेक पदार्थांत तिखट चवीसाठी हिरव्या मिरच्या वापरल्या जातात. त्या घरी सहज उगवता येतात. एका कुंडीत मातीत हिरव्या मिरचीच्या बिया पेराव्यात. ही कुंडी सूर्यप्रकाश असलेल्या ठिकाणी ठेवा. झाडाला नियमितपणे पाणी दिल्यास तीन महिन्यांच्या आत तुमचे रोप हिरव्या मिरचीने भरून जाईल.

**जिरे**

जिऱ्याची लागवड करण्यासाठी चांगल्या प्रतीचे बियाणे निवडा. बियाणे ताजे असावे. या रोपासाठी साधी माती, कोकोपीट, वाळू आणि सेंद्रिय खत वापरून एक चांगले पॉटिंग मिक्स तयार करा. जिऱ्याच्या लागवडीसाठी १०-इंची कुंडी पुरेशी आहे. कुंडीला पाण्याचा निचरा होण्यासाठी छिद्रे असावीत. बियाणे १/२ इंच खोल मातीत पेरा. जिऱ्याच्या बिया ७-१० दिवसांत रुजतात. बिया रुजण्याच्या काळात माती ओलसर ठेवा. जेव्हा जिऱ्याच्या झाडाला फुले येतात तेव्हा ती काढून टाका. यामुळे झाडाला अधिक बिया तयार करण्यास प्रोत्साहन मिळेल. जेव्हा जिऱ्याच्या बिया तपकिरी रंगाच्या होतात, तेव्हा त्यांची काढणी करा.

**पुदिना**

पुदिना चटण्या, रायता, सॅलड आणि इतर अनेक पदार्थांमध्ये वापरले जाते. किचन गार्डनमध्ये एका लहान कुंडीत पुदिना लावता येईल. साधारण ६ ते ९ इंची कुंडीमध्ये पुदिना लावावा. पुदिना सूर्यप्रकाश असलेल्या ठिकाणी ठेवा आणि नियमित पाणी द्या.

**बडीशेप**

घरात कुंडीत किंवा बागेत बडीशेप उगवण्यासाठी ६-८ तास सूर्यप्रकाश, पाण्याचा निचरा होणारी सुपीक माती आणि १२-इंच खोलीची कुंडी आवश्यक आहे. बिया थेट कुंडीत किंवा जमिनीत १/४ इंच खोल पेराव्यात. बिया पेरण्यापूर्वी काही तास पाण्यात भिजवल्यास जलद वाढ होते. या झाडाला ६-८ तास सूर्यप्रकाशाची गरज असते. माती ओलसर राहील इतके पाणी द्या. लागवडीनंतर सुमारे ८० दिवसांनी किंवा पाने पूर्ण वाढल्यावर कापणी सुरू करता येते.

**कोथिंबीर**

वरून कोथिंबिरीने गार्निश केल्याशिवाय कोणताही पदार्थ सर्व्ह केला जात नाही. त्यामुळे रोजच्या जेवणात लागणारी कोथिंबीर तुम्ही घरी सहज वाढवू शकता. त्यासाठी धणे हलक्या हाताने रगडून घ्या. यामुळे अंकुर लवकर फुटतात. साध्या कुंडीत किंवा पसरट टबमध्ये माती आणि खत यांचे मिश्रण भरा. बिया मातीत पेरून घ्या. दररोज हलके पाणी शिंपडा, माती ओलसर ठेवा. तसेच सूर्यप्रकाश येईल अशा ठिकाणी कुंडी ठेवा.

**हळद**

हळद भारतीय स्वयंपाकघरातील एक महत्त्वाचा मसाला आहे, हळद चव, रंग तसेच औषधी गुणधर्मांसाठी ओळखली जाते. हळद घरी कुंडीत सहजपणे वाढवता येते. जमिनीत ५-७ इंच खोलवर निरोगी हळदीचे कंद लावा. माती हलकी आणि पाण्याचा चांगला निचरा होणारी असावी.

हळदीला जास्त पाणी लागत नाही, म्हणून नियमितपणे पण माफक प्रमाणात पाणी द्या. हळद अंदाजे ७-९ महिन्यांत काढणीसाठी तयार होते आणि लहान कंद वेळोवेळी काढता येतात.

# अनुसूचित जातींचे अ,ब,क,ड वर्गीकरण : सामाजिक न्याय की शासनाचे सूक्ष्म धोरण

भारतीय लोकशाहीत ‘सामाजिक न्याय’ हा केवळ शब्द नाही, तर तो संविधानाने दिलेला नैतिक आदेश आहे. पण हा आदेश प्रत्यक्षात किती पाळला जातो? अनुसूचित जातींना दिलेल्या आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत पोहोचतो का, की तो काही मोजक्यांच्याच हातात केंद्रित झाला आहे? या पार्श्वभूमीवर अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याचा प्रस्ताव समोर येतो आणि एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतो. हे खरोखरच न्यायाचा विस्तार आहे, की समाजातील एकजूट कमकुवत करण्याचा सूक्ष्म राजकीय प्रयोग? अनुसूचित जाती हा एकसंध, समरूपी गट आहे, ही कल्पना वास्तवाशी विसंगत आहे. या वर्गात सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक पातळीवर प्रचंड विषमता आहे. काही जातींनी शिक्षण, नोकरी आणि सत्तेच्या प्रवेशद्वारांवर आपली ठाम छाप निर्माण केली आहे; तर काही जाती अजूनही उपेक्षा, दारिद्र्य आणि संधीअभावी अंधारात चाचपडत आहेत. परिणामी, आरक्षणाचा लाभ काही मर्यादित गटांमध्येच केंद्रीत राहिल्याची टीका केवळ राजकीय नाही, तर सामाजिक वास्तवावर आधारित आहे. या पार्श्वभूमीवर वर्गीकरणाचा विचार पुढे येणे स्वाभाविक आहे.

वर्गीकरणाचे समर्थक एक मूलभूत तत्त्व मांडतात, “समानता म्हणजे सर्वांना सारखे देणे नव्हे, तर ज्यांना जास्त गरज आहे त्यांना अधिक देणे.” ही भूमिका सामाजिक न्यायाच्या मूळ तत्त्वाशी सुसंगत आहे. कारण आजही काही अनुसूचित जाती शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या मूलभूत संधींपासून वंचित आहेत. अशा परिस्थितीत, जर आरक्षणाचा मोठा वाटा आधीच सक्षम झालेल्या घटकांकडेच गेला, तर उर्वरित घटकांसाठी न्यायाची संकल्पना केवळ कागदावरच उरते. अ, ब, क, ड वर्गीकरणामुळे सर्वात मागासलेल्या घटकांना प्राधान्य मिळू शकते, आरक्षणाचे लाभ अधिक संतुलित रीतीने वाटले जाऊ शकतात आणि सामाजिक समावेशनाला खऱ्या अर्थाने चालना मिळू शकते. म्हणूनच काहींसाठी हे धोरण म्हणजे न्यायाच्या नव्या अध्यायाची सुरुवात आहे.

मात्र, या धोरणाकडे संशयाच्या नजरेने पाहणाऱ्यांची संख्या कमी नाही. त्यांचा सरळ आरोप आहे. हे वर्गीकरण म्हणजे अनुसूचित जातींच्या एकजुटीवर घाला घालण्याचा प्रयत्न आहे. इतिहास साक्षी आहे की, एकजूट असलेला समाज हा राजकीयदृष्ट्या प्रभावी असतो. त्यामुळे त्यात फूट पाडणे हे सत्ताधाऱ्यांसाठी सोयीचे ठरते. “अ, ब, क, ड” या वर्गीकरणामुळे जातींमध्ये स्पर्धा, असूया आणि संघर्ष वाढण्याची भीती व्यक्त केली जाते. याहून महत्त्वाचे म्हणजे वर्गीकरणाचे निकष कोण ठरवणार? त्यात पारदर्शकता असेल का? आणि सर्वात महत्त्वाचे राजकीय हस्तक्षेप टाळला जाईल का? हे प्रश्न अनुत्तरित राहिल्यास, हे धोरण न्याय नव्हे, तर नियोजित विभाजन ठरू शकते.

या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयानेही महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. राज्यांना उपवर्गीकरणाचा अधिकार असला, तरी तो ठोस, वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक आकडेवारीवर आधारित असला पाहिजे, असा स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिला आहे. घटनेतील कलम 14 आणि 16 यांचा विचार करता, कोणतेही वर्गीकरण हे तर्कसंगत आणि न्याय्य असले पाहिजे. अन्यथा, ते घटनाबाह्य ठरू शकते. यातून एक गोष्ट स्पष्ट होते. भावना, राजकारण आणि घोषणांपेक्षा तथ्य आणि पुरावे अधिक महत्त्वाचे आहेत. या संपूर्ण वादात सर्वात महत्त्वाचा आवाज कोणाचा आहे? तर तो तळागाळातील समाजाचा. अनेक अत्यंत मागासलेल्या जातींना वाटते की, आरक्षणाचा लाभ त्यांच्या दारात कधीच पोहोचला नाही. त्यांच्यासाठी वर्गीकरण म्हणजे पहिल्यांदाच दिसलेली संधी आहे. पण दुसरीकडे, काही प्रगत घटकांना भीती वाटते की, त्यांच्या मेहनतीने मिळवलेल्या संधींवर गदा येईल. त्यामुळे हा संघर्ष केवळ धोरणात्मक नाही; तो अस्तित्व, ओळख आणि स्वाभिमानाचा संघर्ष बनतो.

कोणतेही धोरण त्याच्या उद्देशाने नव्हे, तर अंमलबजावणीने मोजले जाते. जर शासनाने पारदर्शकता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि निष्पक्षता यांचा अवलंब केला, तर हे वर्गीकरण खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाचे साधन ठरू शकते. पण जर त्यामागे मतांचे गणित, सत्तेची आकांक्षा आणि समाजात फूट पाडण्याचा हेतू असेल, तर हे धोरण लोकशाहीच्या आत्म्यालाच तडा देणारे ठरेल. या वादातून मार्ग काढण्यासाठी काही ठोस पावले आवश्यक आहेत. सर्वसमावेशक आणि अद्ययावत डेटा संकलन करावे. स्वतंत्र, निष्पक्ष आयोगाची स्थापना करणे. कालबद्ध पुनरावलोकनाची यंत्रणा आणि समाजातील विविध घटकांमध्ये संवाद आणि विश्वास निर्माण करणे. अनुसूचित जातींचे अ, ब, क, ड वर्गीकरण हा केवळ प्रशासकीय निर्णय नाही; तो भारतीय समाजाच्या नैतिकतेची परीक्षा आहे. जर हे धोरण खरोखरच सर्वात वंचित घटकांना न्याय देणार असेल, तर ते नक्कीच स्वागतार्ह आहे. पण जर ते समाजात फूट पाडण्याचे, राजकीय फायद्यासाठी वापरण्याचे साधन ठरणार असेल, तर त्याला ठाम विरोध करणे हीच खरी लोकशाही ठरेल. शेवटी, प्रश्न वर्गीकरणाचा नाही तर तो न्यायाच्या प्रामाणिकतेचा आहे आणि त्या प्रामाणिकतेची परीक्षा आता सरकारसोबतच संपूर्ण समाजालाही द्यावी लागणार आहे.

आज गरज आहे ती घोषणांची नाही, तर प्रामाणिकतेची. जर अ, ब, क, ड वर्गीकरणाच्या माध्यमातून खरोखरच सर्वात वंचित घटकांना न्याय मिळणार असेल, तर त्याचे स्वागत करण्यास कुणालाही हरकत नसावी. पण जर हा प्रयोग समाजातील एकजूट खिळखिळी करून राजकीय फायद्याची पायाभरणी करण्यासाठी रचला गेला असेल, तर तो लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरेल. सत्ताधाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, वंचितांना न्याय देणे म्हणजे केवळ धोरण आखणे नाही, तर विश्वास निर्माण करणे आहे आणि जर हा विश्वासच ढासळला, तर वर्गीकरणाचे हे गणित केवळ कागदावरच राहील; पण समाजात निर्माण होणारी दरी मात्र पिढ्यानपिढ्या भरून निघणार नाही.



प्रवीण बागड़े

---



# वैमनस्यात बुद्धीचा अपव्यय !

स्थलांतर जसं महत्त्वाचं तसंच युगांतरही महत्त्वाचं आहे. स्वामी विवेकानंद तेव्हाच जपान, अमेरिका, इ. चा दाखला देऊन आपल्याला सांगत होते की जागे व्हा, उठा, प्रगती करा, खूप मागे राहिलोय आपण. आता बरीच प्रगती झालीय. स्थलांतर करून इतर देशांना जावे, पण आपल्या देशातही आंतरराष्ट्रीय संस्था उभ्या रहाव्यात म्हणूनही ध्यास घ्यायला हवा. पक्षी, प्राणी, निसर्गाने त्यांना दिलेल्या शक्ती-बुध्दीचा वापर करून जगतात. माणूस त्यातली अर्ध्याहून अधिक बुध्दी आपसातल्या वैमनस्यात व्यर्थ घालवत आहे.

पूर्वी पेपरात किंवा एखाद्या मासिकात बातमी यायची आणि एखादे अचाट कृत्य, नवा विक्रम, निसर्गाचा एक नवा देखावा आपल्याला माहीत व्हायचा. आता हे काम व्हॉट्सॲपवर केले जाते. त्यातली एखादी माहिती चकित करून जाते. अशीच एक बातमी वाचली. एका छोट्या पक्षाने अमेरिकेतील अलास्का येथून उड्डाण केलं ते संपूर्ण पॅसिफिक महासागर ओलांडून तो ऑस्ट्रेलियातील टास्मानियाला पोहोचला. या पक्षाचे नाव बार टेल्ड गॉडविट असे आहे. हे अंतर तेरा हजार पाचशे साठ किलोमीटर आहे. वाटेत कुठेही जमीन नाही. तो सतत उडत होता. अशक्यप्राय वाटणारी गोष्ट. मोठ्या पक्षांनासुध्दा महासागर ओलांडता येतो की नाही, हे आपल्याला ठाऊक नसतं. खरं तर नाहीच. अनेक स्थलांतर करणारे पक्षी आहेत पण ते बहुतेक टप्याटप्याने प्रवास करतात. वाटेत थांबतात. काही खातात. झोपही घेतात आणि पुढे जातात. पण हा चिमणीहून लहान पक्षी असा अफाट प्रवास करतो. त्याचे वजन साडेतीनशे ते चारशे ग्राम असतं. उपग्रहाद्वारे त्याच्यावर लक्ष ठेवण्यात आलं आणि हे विक्रमी उड्डाण नोंदल गेलं. पूर्वीचा असा विक्रमही त्याच जातीच्या पक्षाच्या नावावर होता. ज्यात त्याने अकरा हजार किलोमीटर अंतर पार केले होते. जे अंतर पार करायला विमानाला चोवीस तास लागतात ते पार करायला याला अकरा दिवस लागले. विमान एका दिवसात जातं खरं पण त्यासाठी कितीतरी ऊर्जा त्याला पुरवावी लागते. या पक्षाला ऊर्जा कुठून मिळत होती. प्रवासाचे दिवस जवळ आले तेव्हा त्याने नेहमीपेक्षा जास्त खायला सुरूवात केली. असं जादा खाल्लेलं अन्न तो शरीरातच मलरूपात साठवतो. प्रवासात तेच खातो परत शरीरातच साठवतो व परत अन्न करून खातो. कुठूनही अन्नाचा कणही बाहेरून त्याला मिळत नाही की पाण्याचा घोट नाही. खाली अथांग समुद्र. समुद्रावरून विमानातून जातानाही माणसाच्या मनात वर आकाश आणि खाली दृष्टी पोहोचते तिथवर दिसणारा समुद्र पाहून देवा म्हाराजा, आमका सुखरूप ने रे म्हणावसं वाटत असणार. त्या पक्ष्याला त्या समुद्राचं भय नसावं? बहुतेक नसावं. भय वाटलं असतं तर तो हे अंतर पार करूच शकला नसता. हा पक्षी स्थलांतर का करतो? तर ऋतुबदल. खूप थंडीत त्याला खाणं मिळणंही मुश्कील आणि थंडीला तोंड देणंही मुश्कील. त्याला निसर्गानेच एवढं ज्ञान दिलं आहे की आता त्याला उबदार हवामान कुठे मिळेल? त्याला खायला कुठे मिळेल. त्याप्रमाणे तो आपला प्रवास ठरवतो आणि करतो.

सायबेरीयन क्रेन्स किंवा कुरजा नावाने ओळखले जाणारे पक्षी असंच स्थलांतर करून नोव्हेंबर ते फेब्रुवारीदरम्यान भारतात येतात. ते मात्र आपल्या प्रवासात थांबे घेतात. त्यांच्या या थांबे घेण्याचा गैरफायदा घेऊन माणसाने त्यांची शिकार केली नसती तरच नवल! यामुळे त्याच्या काही प्रजाती नष्टच झाल्या. त्याचे उंच पाय आणि पांढरा रंग व आकार यांनी ते दिसतात सुंदर. नवी मुंबई येथे त्यांचे थवे उतरतात. खूप सुंदर दृश्य असतं ते. नैसर्गिक कारणांमुळे पक्षी हे वर्षानुवर्षे असं स्थलांतर करतात. हे स्थलांतर दूर अंतरावरच. त्या शिवाय देशांतर्गत अथवा काहीशे किंवा हजार-दोन हजार किलोमीटर स्थलांतर बरेच पक्षी करतात. मानवाच्या ढवळाढवळीमुळे पाण्याची साधने, उघडे तलाव, इ. नष्ट झाले की त्यांचा नाईलाज होतो. ते हळूहळू त्या भागात दिसेनासे होतात.

माणसाच्या प्रजातींनी किती स्थलांतरे केली ह्याची अचूक नोंद नाही. पहिला मानव आफ्रिकेत जन्माला आला व तिथून तो जगभर स्थलांतरित झाला, असे म्हटले जाते. होमो हॅबिलिस आणि होमो सेपियन्स, हे आपले पूर्वज सर्वप्रथम आफ्रिकेत निर्माण झाले व नंतर सर्वत्र पसरले, अशी मान्यता सध्या आहे. शंभरपैकी नव्याण्णव मुलांना हे पटणार नाही कारण आफ्रिकन म्हणजे फक्त कृष्णवर्णीय लोकांचं स्थान, असा समज आहे. आफ्रिका खंड प्रचंड आहे. शिवाय मानवाच्या अस्तित्वाच्या काळात किमान दोन चार वेळा तरी प्रलयसदृश्य परिस्थिती, मोठे भूखंड हलवणारे भूकंप होऊन पृथ्वीवरील जमिनीचा आकार बदलला आहे. जसे पक्षी अन्नाच्या शोधात स्थलांतर करतात, अगदी तसंच माणूस अन्नाच्या शोधात जगभर पसरला.

तीच मळमळ अमेरिकन अध्यक्षांनी बोलून दाखवली. त्यांना अनेक कंपन्यात वरच्या जागांवरचे भारतीय, व्यापार काबूत घेऊन बसलेले चिनी लोक दिसू लागले. ही सहज मानवी प्रवृत्ती आहे. जी आमच्या पिढीने लहानपणी रेल्वेने दूरचा प्रवास करताना अनुभवली होती. वर म्हटल्याप्रमाणे बाहेरच्यांना आत जागा दिसते. त्यांना काही करून प्रवास करायचाच असतो. तर आतल्या लोकांना आपले स्वास्थ्य वाटून घ्यायची इच्छा नसते. अमेरिकन अध्यक्षांनी व्हिसाचे दर भरमसाठ वाढवले. नवीन येण्यावरील बंधने वाढविली. इतर अनेक विकसनशील देशांतील मुले शिक्षण घेताना अमेरिकेला उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न मनाशी बाळगून अभ्यास करतात, करत होती. त्या देशांनी आता जागं व्हायची वेळ आली आहे. आमच्या देशांत नालंदा, तक्षशिलासारखी आंतरराष्ट्रीय विद्यालये होती, हा इतिहास आता तुम्हाला तारणार नाही. हार्वर्ड किंवा लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्ससारखी दर्जेदार विद्यालये, उत्तम विज्ञानसंस्था देशात उभाराव्या लागतील. त्यासाठी प्रथम शैक्षणिक क्षेत्रात शिक्षणालाच अग्रक्रम मिळायला हवा. तिथून उत्तीर्ण होणाऱ्यांना इथेच उत्तम संधी मिळायला हव्यात. हे सर्व अशक्य आहे का? मला तरी अशक्य वाटत नाही. कारण भारताची शिकविण्याची परंपरा आहे. भारतात तेवढी बुद्धिमत्ता असलेले पुष्कळ लोक आहेत. त्यांना संधी हवी आहे आणि आपल्या लोकांनी अमेरिकन अध्यक्षांनी आणलेल्या अडचणीत संधी शोधली पाहिजे. आता तर अमेरिका युध्दात शिरली आहे. आपल्या अडचणी अजून वाढतील, अशी चिन्हं आहेत, पण आपण हाच मंत्र घोकत मार्ग काढला पाहिजे की प्रत्येक अडचण ही बरोबर एक संधी घेऊनच येत असते. या अडचणींतून मार्ग काढायला भारतीयांनी राजकारणातील पक्षभेद तात्पुरते बाजूला ठेवले पाहिजेत.

सध्या दोन पक्ष दोन वेगळ्या देशांचे वेगळ्या दिशेने जाणारे पक्षी वाटतात. एक थवा होऊन त्या इवल्याशा पक्षाचे उदाहरण समोर ठेवून पुढचा प्रवास केला पाहिजे. स्थिरपणे. लक्ष्यावरची नजर न हटवता, न थकता प्रगतीकडे प्रवास केला पाहिजे. स्थलांतर जसं महत्त्वाचं तसंच युगांतरही महत्त्वाचं आहे. स्वामी विवेकानंद तेव्हाच जपान, अमेरिका, इ. चा दाखला देऊन आपल्याला सांगत होते की जागे व्हा, उठा, प्रगती करा, खूप मागे राहिलोय आपण. आता बरीच प्रगती झालीय. स्थलांतर करून इतर देशांना जावे पण आपल्या देशातही अशा संस्था उभ्या रहाव्यात म्हणूनही ध्यास घ्यायला हवा. पक्षी, प्राणी, निसर्गाने त्यांना दिलेल्या शक्ती-बुध्दीचा वापर करून जगतात.

माणूस त्यातली अर्ध्याहून अधिक बुध्दी आपसातल्या वैमनस्यात व्यर्थ घालवत आहे. या युध्दात होणारी हानी आणि विध्वंस मानवाची हानी आहे, हे एकविसाव्या शतकातल्या मानवाला सांगावं का लागावं? मानवजातीची स्मरणशक्ती इतकी कमकुवत आहे का की तिला ८७ वर्षांपूर्वी झालेल्या युध्दातील हानीचं विस्मरण झालं? – **अरविंद खानोलकर**

---

# उन्हाळ्यात नवजात बाळांची अशी घ्या काळजी



उन्हाळ्यात नवजात बाळांचीही विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. कारण उन्हाचा कडाका वाढला की मोठ्यांप्रमाणेच नवजात बाळांनाही खूप त्रास होतो. तसेच त्यांची त्वचा अत्यंत संवेदनशील असते आणि त्यांच्या शरीरातील तापमान नियंत्रण करण्याची क्षमता अजून पूर्णपणे विकसित झालेली नसते. बऱ्याचदा पालक बाळाची काळजी घेताना नकळत काही चुका करतात. उन्हाळ्यात या चुका टाळल्या पाहिजेत.

**सुती कपडे**

उन्हाळ्यात बाळाला कपडे घालताना ते आरामदायी असल्याची खात्री करा. त्यांना नेहमी सुती, हलके, सैल आणि मऊ कपडे घाला. सुती कपड्यांमुळे घाम शोषला जातो आणि हवा खेळती राहते. घरात असल्यावर बाळाला एकापेक्षा जास्त कपडे घालणे टाळा. तसेच त्यांना जास्त गुंडाळून ठेवू नका. बाहेर जाताना बाळाला टोपी बांधा. सुती, रेशमी किंवा लोकरीची टोपी बाळासाठी चांगली असते.

**हायड्रेशन**

मोठ्यांप्रमाणे लहान बाळांनाही उन्हाळ्यात सारखी तहान लागू शकते. त्यामुळे बाळ सतत रडत असेल किंवा किरकिर करत असेल तर ब्रेस्ट फिडींग करा. लक्षात ठेवा सहा महिन्यांपेक्षा लहान बाळांना वेगळे पाणी देण्याची गरज नसते, आईच्या दुधात ८०% पेक्षा जास्त पाणी असते, ते बाळाची तहान भागवण्यासाठी पुरेसे असते. पण सहा महिन्यांपेक्षा मोठ्या बाळाला तुम्ही हलक्या अन्नासह थोडे थोडे पाणी देऊ शकता.

**घराचे तापमान आणि वातावरण**

घरात बाळ असेल तर थंड वातावरण राखणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे दिवसा खिडक्या बंद करा आणि पडदे लावा जेणेकरून गरम हवा आत येणार नाही. संध्याकाळी खिडक्या उघडा आणि हवा खेळती राहूद्या. तुम्ही पंखा किंवा एसी वापरू शकता पण बाळाला त्याची थेट हवा लागणार नाही याची काळजी घ्या. एसीचे तापमान साधारण २४°C ते २६°C दरम्यान ठेवावे.

**स्वच्छता**

या ऋतूत बाळाला कोमट पाण्याने आंघोळ घालावी. जर खूप उष्णता असेल तर दिवसातून दोनदा ओल्या सुती कापडाने बाळाचे शरीर पुसून घेतले तर चांगले असते. घामामुळे बाळाच्या मानेवर किंवा अंगावर पुरळ येऊ शकतात.

अशा वेळी त्यांचे शरीर कोरडे ठेवा आणि पावडरचा अतिवापर टाळा. त्याऐवजी तुम्ही अंघोळ घालण्यापूर्वी बाळाला तेलाने मालिश करू शकता.